www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ मतदानावर बहिष्कार टाकलेल्या तृतीय...
पान ३ वर....



■ लोकसभांच्या चुका सुधारून विधानसभेत योग्य नियोजनामुळे...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १७२ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार,२१ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## महाराष्ट्राच्या जनतेचा कौल कुणाला ? ६ पैकी ५ एक्झिट पोलमध्ये महायुती जिंकण्याचा अंदाज

● ठाणे, यश सावंत :

महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ जागांसाठी आणि झारखंडमधील दुसऱ्या टप्प्यातील ३८ विधानसभा जागांसाठी बुधवारी मतदान प्रक्रिया पार पडली. झारखंडमध्ये १३ नोव्हेंबरला पहिल्या टप्प्यात ४२ जागांवर मतदान झाले. राज्यात ८१ जागा आहेत. दोन्ही राज्यांचे निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहेत. तर तर एका एक्झिटपोलच्या अंदाजानुसार महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता स्थापन होण्याचा



अंदाज सांगण्यात आला आहे. तर झारखंडसाठी आतापर्यंत ३ एक्झिट पोल आले आहेत. तिन्ही ठिकाणी भाजप आघाडीला बहुमत मिळण्याची अपेक्षा आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या एक्झिट पोलमध्ये हे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. यात न्युज १८ मॅट्रिजमध्ये १५०-१६० जागा भाजपप्रणित महायुतीला आणि ११० ते १३० जागा महाविकास आघाडीला मिळणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर ८-१० जागा अपक्षांना मिळू शकतात. त्याच बरोबर P-MARQ च्या आकडेवारीनुसार १३७-१५७ जागांवर महायुती आघाडीवर असेल तर १२६-१४६ जागांवर महाविकास आघाडी आघाडीवर असेल, तर २-८ जागांवर अपक्ष उमेदवारांना मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

याशिवाय पीपुल्स पल्स या संस्थेने केलेल्या एक्झिट पोलनुसार, महाराष्ट्रात १७५-१९५ जागा महायुतीला, ८५-१२ जागांमहाविकास आघाडीला मिळतील असा - अंदाज वर्तवला आहे. तर ७-१२ जागांवर अपक्ष उमेदवार जिंकण्याचा अंदाज वर्तवला आहे. न्युज-२४ चाणक्य या संस्थेने केलेल्या एक्झिट पोलच्या सर्वेक्षणात १५२-१६० जागा महायुतीला, १३०-१३८ जागा महाविकास आघाडीला आणि ६-८ जागा अपक्षांना मिळण्याचा अंदाज वर्तवला आहे. पान २ वर

## ११३ वर्षीय आजीने गृहमतदान न करता मतदान केंद्रापर्यंत जाऊन केले मतदान



● ठाणे, रोहित जैसवार :

११३ वर्षीय आजींनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. ठाण्यातील विठाबाई दामोदर पाटील असे या आजीचे नावे आहे. विशेष म्हणजे या आजीबाईंनी गृहमतदान न करता मतदान केंद्रापर्यंत जाऊन मतदान केले आहे. त्यामुळे सर्व मतदारांसमोर त्यांनी मतदान करायला कोणतीही कुचराई न करता हक्काने मतदान करावे असा एक आदर्श ठेवला आहे.

## महाडमध्ये मतदानाच्या दिवशीच भानामतीचा प्रकार






● रायगड, भावना जैन :

एकीकडे मतदान सुरू असतानाच दुसरीकडे रायगड जिल्ह्यातील बिरवाडीमध्ये भानामतीचा प्रकार केल्याचं समोर आला आहे. महाडजवळील बिरवाडी शहराच्या नाक्यावर एका रस्त्यावर मधोमध तीन मडकी आणि नारळ रचून ठेवण्यात आल्याचं दिसून आलं. लाल आणि काळ्या फडक्याने मडक्याचं तोंड बंद करून खाली नारळ अशा स्वरूपात हा भानामतीचा प्रकार केल्याचं समोर आला आहे. बिरवाडी आसनपोई रस्त्यावरील नाक्यावर आगदी मधोमध हा उतारा ठेवण्यात आला आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये काही प्रमाणात भीती आणि संतापाचे वातावरण पसरले आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर कोणी देवदेवस्की केल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

## मणिपूरमध्ये शांतता नांदावी यासाठी तात्काळ हस्तक्षेप करा ! मल्लिकार्जुन खर्गेंचे राष्ट्रपतींना पत्र

● नवी दिल्ली, प्रगतीस शर्मा :



मणिपूरमधील परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत आहे. तेथे शांतता नांदावी यासाठी तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. गेल्या १८ महिन्यांपासून मणिपूरमधील नागरिक भयभीत आहेत. तेथील परिस्थिती हाताळण्यात केंद्र आणि राज्य सरकार सपशेल अपयशी ठरल्याने नागरिकांचा सरकारवरील विश्वास उडाल्याचा आरोप खरगे यांनी केला आहे. मणिपूरमधील हिंसाचारात आतापर्यंत ३०० हून अधिक जणांचा बळी गेला असून, त्यात महिला, मुलांसह बालकांचाही समावेश आहे. तेथील ढासळत चाललेल्या कायदा आणि सुव्यवस्थेमुळे सुमारे एक लाखांवर लोक विस्थापित झाले आहेत. नागरिकांच्या यातना अद्याप कमी झाल्या नसल्याचे खरगे यांनी पत्रात नमूद केले आहे. पान २ वर

## मतदान केंद्राबाहेर गाडीत सापडले लॅपटॉप, राऊटर; पोलिसांना वेगळाच संशय

● नवी मुंबई, भावना जैन :



राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान सुरू असतानाच नवी मुंबईत नेरूळमध्ये एका गाडीत संशयास्पद वस्तू आढळून आल्यानं खळबळ उडाली होती. या प्रकरणी आता मोठा खुलासा झाला आहे. नेरूळमधील शिवाजी नगर परिसरात मतदान केंद्राबाहेरच एका गाडीत लॅपटॉप, जॅमरसारखे साहित्य आढळले होते. मतदान मशीन हॅक करणारी यंत्रणा असावी या संशयावरून तुर्भे पोलिसांनी गाडीसह एकाला ताब्यातही घेतलं होतं. याबाबत मिळालेली माहिती अशी की, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्राच्या परिसरात कडेकोड बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. नेरुळमध्ये शिवाजीनगर परिसरात एका गाडीत काही संशयास्पद हालचाली आढळून आल्या. गाडीची तपासणी केली असता लॅपटॉपसह इतर साहित्य सापडले. पोलिसांनी या प्रकरणी चौकशी केली असता मोबाईलमधील चीप टेस्ट करण्याचं हे काम असल्याचं सांगण्यात आलं. पान २ वर

## नांदगावमध्ये तुफान राडा, भुजबळ-कांदेंचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले



● नाशिक, सचिन कदम :

नाशिकच्या नांदगाव मध्ये समीर भुजबळ आणि शिंदे गटाचे विद्यमान आमदार सुहास कांदे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला. मतदानासाठी आणण्यात आलेल्या मतदारांच्या मुद्यावरून दोन्ही गटात राडा झाला. या घटनेमुळे मतदारसंघात तणावाचे वातावरण होते. नांदगाव-मनमाड मार्गावर हा राडा झाला. पान २ वर

## अल्पवयीन मुलाने दारू पिऊन वेगात गाडी चालवून तीन वाहनांना उडवले, रिक्षाचालक ठार

● पुणे, अभिजित येरल्लू :

दिघीतील लष्कराच्या तंत्रज्ञान संस्थेत अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत भरधाव कार चालवून एक रिक्षा आणि दोन दुचाकींना धडक दिली. या भीषण अपघात रिक्षा चालकाचा मृत्यू झाला. तर, दुचाकीवरील दोघेजण गंभीर जखमी झाले. हा अपघात सोमवारी रात्री पावणेदहाच्या सुमारास पुणे-नाशिक महामार्गावर भोसरी येथे घडला. अमोद कांबळे (वय २७, रा. भोसरी) असे मृत्युमुखी पडलेल्या रिक्षाचालकाचे नाव




आहे. तर, दोन दुचाकीचालक गंभीर जखमी झाले आहेत. त्यानं त्यातडीने भोसरी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी मूर्तजा अमीरभाई बोहरा (वय ३२, रा. इंद्रायणीनगर, भोसरी) यांनी दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अल्पवयीन आरोपी मुलाचे वय १७ वर्षे १० महिने आहे. आरोपी मुलगा मुळचा आसामचा असून तो दिघीतील लष्करी तंत्रज्ञान संस्थेत अभियांत्रिकीच्या पहिल्या वर्षात शिकत आहे. त्याचे वडील लष्करात जवान आहे. ते आसाम येथे कार्यरत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अल्पवयीन मुलगा हा त्याच्या मित्राच्या मोटारीमधून भोसरीहून नाशिक फाट्याच्या दिशेने येत होता. यावेळी त्याने दारू प्यायली होती. नशेत त्याने गाडी चालवली. त्याच्यासमवेत त्याचा एक मित्र देखील कारमध्ये होता. आरोपी अल्पवयीन मुलाकडे वाहन चालविण्याचा परवाना देखील नव्हता. असे असतांना त्याने दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवून वाहनांना धडक दिली. पान २ वर

## दिंडोरी येथे निवडणूक प्रक्रियेत हलगर्जीपणा, ९ शिक्षकांविरुद्ध गुन्हा दाखल

● दिडोरी, विशाल पाटील :




दिंडोरी येथे निवडणूक मतदान प्रक्रियेत गैरहजर राहिलेल्या नऊ शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिंडोरी येथे निवडणूकविषयक प्रशिक्षणासह कामास नऊ शिक्षक गैरहजर राहिले. याबाबत दिंडोरीचे तहसीलदार वसंत धुमसे (५२, रा. नाशिक) यांनी माहिती दिली. दोन हजार १३० मतदान अधिकारी, कर्मचारी यांचे मंगळवारी दिंडोरी येथील महाविद्यालयात तिसरे प्रशिक्षण शिबीर पार पडले. यानंतर त्यांना मतदान साहित्य देत केंद्रांवर पाठविण्यात आले. परंतु, प्रशिक्षण वर्गासह पुढील कामकाजास नऊ अधिकारी, कर्मचारी गैरहजर राहिले. पान २ वर

## बारामतीत हाय व्होल्टेज ड्रामा; दोन्ही गटात शाब्दिक बाचाबाची होऊन एकमेकांना दमदाटी

● बारामती, नितीन देवळेकर :

बारामतीत बुधवारी दोन तास हाय व्होल्टेज ड्रामा पाहिला मिळाला. बारामती शहरातील बालक मंदिर येथील बुथवर हा ड्रामा पाहिला मिळाला. या बुथवर येणाऱ्या मतदारांच्या हातामध्ये घड्याळ चिन्ह असलेल्या मतदानाच्या चिट्ठ्या होत्या. घड्याळाचे चिन्ह असलेल्या चिट्ठ्या मतदारांच्या हातात आढळून आल्याने एकच गोंधळ निर्माण झाला होता. सदर बाब शरद पवार गटातील कार्यकर्त्यांच्या लक्षात येताच त्यांनी यावर आक्षेप घेतला.



यावरून दोन्ही गटात शाब्दिक बाचाबाची होऊन एकमेकांना दमदाटी करण्यात आली. दरम्यान सदर बाब महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या आई शर्मिला पवार यांना कळवले असता त्या सदर बुधवर आल्या आणि त्यांनी माहिती घेतली. सदर बाब चुकीची असून, निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सदर केलेला आरोप हा धादांत खोटा आहे. तसं झालेले असेल तर सीसीटीव्ही कॅमेरामध्ये ते रेकॉर्ड झालेले असेल. निवडणूक आयोग बघेल. आज आम्ही एवढ्या निवडणुका पार पाडल्या. मात्र कधीही आमच्या कार्यकर्त्यांनी अशा पद्धतीने कधीही वक्तव्य केलेली नाहीत. आम्ही सुसंस्कृत महाराष्ट्रमध्ये राहत असून, सुसंस्कृतपणा दाखवतो. शाहू, फुले, आंबेडकरांची आमची विचारधारा आहे. त्यामुळे माझा कार्यकर्ता असं करणार नाही, असा माझा माझ्या कार्यकर्त्यांवर ठाम विश्वास आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली.

मला कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आलं की, आम्हाला दबाव येत आहे. दमदाटी केली जात आहे. जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे. आमच्या लोकांची तक्रार करू नको असाही दम दिला जात आहे. मतदानासाठी येणाऱ्या मतदारांकडे घड्याळ चिन्ह असलेल्या चिठ्या मला या ठिकाणी आढळून आलेल्या आहेत. सदर चिठ्ठ्या शर्मिला पवारांनी मीडिया समोर दाखवल्या. याबाबत आम्ही संबंधितांकडे लेखी तक्रार करणार आहोत.

## सरवणकरांच्या कोटवरील उलटं धनुष्यबाण पाहून अमित ठाकरेंनी स्वत:च्या हातांनी केलं सरळ

● मुंबई, राकेश गायकवाड :



सदा सरवणकर आणि अमित ठाकरेंनी मतदानाला जाण्यापूर्वी मुंबईतील प्रभादेवी येथील प्रसिद्ध सिद्धीविनायक मंदिरामध्ये जाऊन दर्शन घेतलं. त्यावेळीच या दोघांची मंदिराच्या आवारात भेट झाली. दोघांनी हस्तांदोलन केलं आणि त्यांनतर एकमेकांना शुभेच्छा दिल्या. अमित ठाकरेंनी सदा सरवणकरांची विचारपूस करताना कसे आहात? असं विचारलं असता सरवणकरांनीही हसत हसतच त्यांच्याशी संवाद साधला. सदा सरवणकरांनी परिधान केलेल्या हाफ बाह्यांच्या जॅकेटवर त्यांच्या पक्षाचं चिन्ह म्हणजेच धनुष्यबाण लावलेला. पीनने लावलेलं धनुष्यबाणाचं हे चिन्ह उलटं झालं होतं. ही गोष्ट अमित ठाकरेंनी लगेच हेरली. त्यानंतर अमित ठाकरेंनी सरवणकरांना चिन्ह उलटं झाल्याचं सांगण्याऐवजी स्वत:च्या हाताने सरवणकरांनी आपल्या कोटवर छातीजवळ लावलेलं हे धनुष्यबाणाचं उलटं चिन्ह सरळ केलं. सरवणकरांनीही हसून अमित ठाकरेंच्या या कृतीबद्दल आभार मानले. पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# मतदार राजा !

मतदानाचा दिवस राज्याच्या राजकारणासाठी आणि १३ कोटी जनतेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मतदाराला राजा असे संबोधले जाते. ते राजेपण दाखवण्याची संधी त्याला आज आहे. राज्यातील ४ हजार १३६ उमेदवार आमदारकीच्या परीक्षेला बसले आहेत आणि राज्यातील ९ कोटी ७० लाख सुजाण लोक म्हणजेच मतदार तब्बल १ लाख १८६ परीक्षा केंद्रांवरून (मतदान केंद्र) या उमेदवारांची उत्तरपत्रिका तपासणार आहेत. त्यातून केवळ २८८ उमेदवार उत्तीर्ण होणार आहेत. दर पाच वर्षांनी निवडणूक होते.

निवडणूक म्हणजे मतदानाचा हक्क जनतेला मिळालेला मोठा अधिकार किंवा मोठी संधी असते, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. कारण त्यांना केवळ त्यांचा लोकप्रतिनिधीच निवडायचा नसतो तर जो उमेदवार अयोग्य आहे त्याला त्याची योग्य जागा दाखवण्याची ही संधी असते. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता ही परीक्षा गांभीर्याने घेईल, अशी अपेक्षा करायला काहीच हरकत नाही. राज्यातील राजकारण पाच वर्षांत संपूर्ण ढवळून निघाले आहे. निवडून कुणाला दिले, तो नंतर कुठल्या पक्षात गेला, कुणाची सत्ता स्थापन झाली, कुणाचे सरकार पडले या सर्व राजकारणात सामान्य माणसाचा श्वास गुदमरून गेला आहे.

२०१९ नंतरचे राज्यातील राजकारण जनतेने यापूर्वी कधीही पाहिलेले नव्हते. त्यामुळेच या विधानसभा निवडणुकीला खूप महत्त्व आले आहे. महाराष्ट्रात मागील पाच वर्षांमध्ये जी राजकीय उलथापालथ झालेली आहे. राजकीय पक्षांमध्ये फूट पडून नवे पक्ष निर्माण झाले आहेत, त्यामुळे समाजमनसुद्धा संभ्रमित झाले आहे. अशा वेळी योग्य भान राखून आणि सारासार विचार करून मतदारांना मतदान करावे लागणार आहे. लोकांनी लोकांचे लोकांसाठी चालवलेले राज्य अशी लोकशाहीची व्याख्या केली जाते. त्यामुळे लोकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

आमदारांकडून राज्याच्या सर्वांगीण विकासाची अपेक्षा असते. त्यातही सत्ताधारी पक्षाचा आमदार असल्यास आणि मंत्री झाल्यास मिळणारे अधिकार वेगळेच असतात. त्यामुळे 'आमदार व्हायचंय मला' अशी प्रत्येकाची इच्छा असते, मात्र तिकीट मिळवण्यापासून जी काही तयारी करावी लागते तेव्हापासून अगदी निवडून येईपर्यंत कोणकोणत्या दिव्यातून उमेदवारांना जावे लागते हे तेच जाणतात. बरं हे एवढ्यावरच नसते.

उमेदवारी न मिळाल्यास पक्ष सोडण्याची धमकी किंवा बंडखोरी करून अर्ज दाखल करणे किंवा यापैकी काहीही न केल्यास सूड म्हणून विरोधी उमेदवाराला छुपा पाठिंबा हे सर्व खुलेआम सुरू असते. जनतेला हे सर्व दिसत असते, शिवाय माध्यमांमधूनही बऱ्याचशा गोष्टी बाहेर येत असतात. त्यामुळे आपल्या मतदारसंघात कोणते उमेदवार आहेत आणि आपण कुणाला निवडून दिले पाहिजे याची प्रत्येक जण मनात जुळवणी करीत असतो. इथेच खरी मतदारांची परीक्षा सुरू होते.


कारण मतदारांना पैसे, दारू, भेटवस्तू यांची प्रलोभने दाखवली जातात. पैसे घेऊन मतदान केले तर पुढील पाच वर्षे आपला आमदार विकासकामांच्या नावाखाली स्वत:च पैसा खाईल आणि जनतेला अपेक्षित सुविधांपासून वंचित ठेवेल. कारण निवडणुकीत वाटलेला पैसा त्याला वसूल करायचा असतो, एवढे लक्षात ठेवावे. त्यामुळे या प्रलोभनांना न भुलता आणि कोणत्याही दबावाला न जुमानता मतदान करायचे असते. कारण मतदान म्हणजे बंदुकीतून सुटलेल्या गोळीसारखे असते. एकदा का मतदान झाले की ते मागे घेण्याची किंवा त्यात बदल करण्याची संधी मतदारांना नसते.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपण ज्या उमेदवाराला मत देणार आहोत तो खरंच आमदार होण्याच्या पात्रतेचा आहे का, याचा विचार प्रत्येक मतदाराने करण्याची नितांत गरज आहे. शिकलेला आणि समज असलेला, अभ्यास करण्याची कुवत असलेला आणि मतदारसंघ सांभाळण्यासाठी प्रचंड वेळ देऊ शकणाऱ्या उमेदवाराची निवड सर्वांसाठी खूप महत्त्वाची असते. मुख्य म्हणजे ज्या विधानसभेत कायदे बनवले जातात तिथे प्रवेश करणारा आपला आमदार नियमांचा भंग करणारा, गुन्हेगारी वृत्तीचा नाही ना, याचीही काळजी मतदारांनी घ्यावी अशी अपेक्षा आहे.

नाहीतर निवडणुकीचा निकाल लागल्यावर आलेली माहिती अनेकदा खूपच धक्कादायक असते. त्यात अनेक विजयी आमदारांवर गंभीर गुन्हे दाखल झाल्याची आकडेवारी समोर येते. अनेक आमदार मौनी असतात म्हणजे ते ना सभागृहात बोलतात, ना चर्चा करतात, मात्र सभागृहाबाहेर ते शेर असतात. विजयी झाल्यानंतर विकासाबाबत जनतेत पक्षभेद न करणारा आमदार असावा. म्हणजे ज्या भागात विरोधकांना मते मिळाली तिथल्या विकासकामांना मुद्दाम डावलणारा नसावा. आमदार म्हणून जी शपथ घेतली जाते ती प्रत्यक्षात आणणारा, त्या शपथेचा आदर करणारा आमदार हवा असेल तर प्रत्येकाने यावेळी खूप विचार करणे गरजेचे आहे. सभागृहात मौनी, अधिवेशनाला दांडी मारणारे आणि बाहेर माध्यमांच्या बूमवर बोलणारे खूप लोकप्रतिनिधी आहेत.

म्हणूनच निव्वळ आरोप-प्रत्यारोपांवर न जाता डोळे उघडून पाहा आणि योग्य उमेदवारालाच आपला लोकप्रतिनिधी म्हणजे आमदार बनवा. हीच संधी आहे, नाहीतर चुकीच्या उमेदवाराला निवडून दिलेत तर मतदार म्हणून पाच वर्षे तुमच्या मतदारसंघाचा विकास खुंटेल आणि तेवढीच वर्षे तो उमेदवार तुमच्या डोक्यावर मिऱ्या वाटेल. हे टाळायचे असेल तर आवर्जून मतदान करा. विचारपूर्वक मतदान करा आणि एका मताने काय होईल, असा चुकीचा विचार अजिबात मनात आणू नका.

# एक मत परिवर्तन घडवू शकते



देशात ९३ टक्के असंघटीत कामगार मजूर आहेत. ती सर्व बहुजन, मागासवर्गीय आहेत आणि सात टक्के संघटीत कामगार मजूर आहेत. ते शिक्षणात आरक्षण मिळाल्यामुळे उच्च शिक्षित झाले त्यामुळे त्यांना नोकरीत पण आरक्षण मिळाले. त्यामुळेच ते आर्थिकदृष्ट्या उच्च वर्गीय होऊन ब्लॉक मध्ये लॉक झाले. यांच्यावर साडेतीन टक्के लोक संख्या असणाऱ्या समाजाची लोक सर्व बाजूने सर्व क्षेत्रात अधिकार गाजवितात. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नव्हता तेव्हा मताचा अधिकार कसा असणार? आज माणूस म्हणून जगण्याचा आणि मतदानाचा अधिकार आहे. तरी शेणातील किडे शेणात राहणे पंसद करतात असे खेदाने म्हणावे लिहावे लागते. कारण काही माणस असणारी किड्या सारखी आजही जगतात. त्यांना मताची किंमत कळत नाही. असे कसे म्हणता येईल ? पोटासाठी देह विक्री करनारी वेश्या आणि पैशासाठी 'मत' विकणारा भ्रष्ट मतदार यात तुलना करणे म्हणजे वेश्येचाच अपमान ठरेल, कारण ती दररोज शरीर विकुन पोट भरते, पण स्वाभिमान, आत्मा विकत नाही. दारू, बिर्यानी, पैसा करीता मत विकनारा मतदार मात्र आपले सर्वस्व स्वाभिमान, आत्मा व सन्मान विकुन कायम लाचार बानतो स्वताही आणि समाजालाही लाचार ठरवतो.

विज्ञानाने खुप प्रगती केली, आता चोरून लपवून कोणते ही काम, व्यवहार केला तर तो उजेडात येण्या करीता चॅनल, प्रिंट मिडियाची गरज नाही. सोशल मिडिया काही तासात त्याला सार्वजनिक करून टाकते. म्हणुनच लोकसभा निवडणुकी नंतर विधानसभा निवडणूका लक्ष्य २०२४ ने अनेक रस्ते, चौक, वार्ड, विभाग सोशल मिडीया ग्रुपने रंगु लागलेत. लोकशाही ने सामान्य माणसाच्या हातात परिवर्तनाच मोठं अस्त्र दिलं. पण त्या अस्त्राचच वस्त्रहरण होत आहे. गल्ली बोळातल्या मतांवर हक्क सांगणारी 'टोळकी' 'ईच्छुकांच्या' दरवाजावर दस्तक देत फिरू लागलीत. या स्पर्धेत कुणीच मागे नाही. त्यात राजकीय मान्यता प्राप्त पक्षाची युती, आघाडी तुटल्या मुळे राजकारणातील घराण्याची प्रतिष्ठा पणाला लागली. त्यामुळे झोपडपट्ट्यामध्ये पैसे, देवदर्शन, साड्यावाटप, दारूच्या मटनाच्या पाटय, मध्यमवर्गीयांच्या सोसायट्यांमधे ब्लॉक, फरशा, रंगकाम, हलदी कुंकु, होम मिनीस्टर..उच्च मध्यमवर्गीयांना व श्रीमंतांना 'मानपान', गळाभेट, मंडळांना वर्गण्या, गणपतीला चांदी, सोने, मंदीराला कळस, असं बरच काही दान धर्मांत मिळत आहे. कारण डोळ्या समोर फक्त निवडणुका आहेत, त्यातला सर्वांत मोठा करोडपती हा फाटक गरीब मतदार आहे, त्यांचे एक मत ही सर्व समीकरण बदलू शकते, म्हणुन त्यांना

सांबाळणारा कार्यकर्ता म्हणून आलेल्या टोळक्यांना दोन पाच हजार रुपये देऊन खुश ठेवावे लागते, हीच तर खरी लोकशाहीची थट्टा, विटंबना आहे, उमेदवारांच्या खैरातीवर जोगवा मागणारा भ्रष्ट मतदार !, देशाचा खरा गद्दार झाला आहे. त्यांचा लाचारी मुळे नालायक, भष्ट्र, चरित्रहीन लायक बनून लोकप्रिय लोकप्रतिनिधि बनत आहेत.

आपण नेहमी अतिरेक्यांना का दोष देता. त्यांना हा देश संपवायचाय तो स्वतःच्या जीवाचे 'बलीदान' देऊन. आणि तुम्ही तो संपवताय, आणि तेही स्वतःच्या स्वार्थासाठी, व्यक्तिगत फायद्यासाठी ?. अतिरेकी तुमच्या पेक्षा इमानदार नाही का? पैसा घेऊन मतदान करता ? काय म्हणावे तुम्हाला ? वेश्या सुद्धा शरीर विकतात ते पोटासाठी! तुम्ही तर देश विकता, वर सांगता उमेदवार कुठ ५ वर्षे भेटतो आम्हाला? अरे भेटत नसेल तर बदल ना त्याला मतदानातुन ! पैसे का मागता. मतदानाच्या दिवशी तर पैसे मिळत नाही तोपर्यंत काही मतदार मतदान करायलाही बाहेर पडत नाही. हे देशातील ९३ असंघटीत कष्टकरी मजूर कामगारांची मनस्थिति आहे. असंघटित कामगार म्हणून तुझी आणि तुझ्या देशाची ही जी अवस्था झाली त्याला तूच जबाबदार आहे. दुसरे कोणी नाही म्हणूनच हे उमेदवार एकदा निवडून आले की तुला कुत्र्यासारखी किंमत देतात आणि त्याचे तुला काहीच कसे वाटत नाही ?.

सुज्ञ व सजग मतदारांची संख्या ज्या दिवशी ७० टक्के होईल तेव्हाच अशा भ्रष्ट मतदारांचा पाडाव शक्य आहे. मतदारांच्या समुहाच राजकिय, सामाजिक, नैतिक प्रतिनीधीत्व जरूर मान्य करावं. पण उमेदवारांचा पैसा मतदारां पर्यंत पोहचवण्याची दलाली करणाऱ्यांच्या पार्श्वभागावर ज्या दिवशी मतदार लाथ घालेल, त्या दिवशी देशात लोकशाही आहे हे मान्य करू व त्याच दिवशी मतदार हा खरा राजा असेल. अन्यथा तो लाचार गुलाम समजल्या जाणार आहे.

'कायदेमंडळावर योग्य उमेदवार निवडून देण्यासाठी आपणास मताचा अधिकार आहे. हा अधिकार फार महत्त्वाचा व मोठा आहे. तेव्हा आपल्या मताची बहुमोल शक्ती भलत्याच ठिकाणी वाया जाता नये. सध्या आपल्या देशात सधन लोक मते विकत घेतात, पण मत हि विकण्याची वस्तू नाही. ती आपली संरक्षणाची साधनशक्ती आहे. मत विकणे हा गुन्हा तर आहेच, पण तो आत्मघातकीपणा देखील आहे. मते विकून लायक नसलेल्या उमेदवारांची खोगीरभरती कायदेमंडळावर केल्याने देशाचे अपरिमित नुकसान होऊन राष्ट्र अधोगतीस जाते. स्वताः नालायक व अपात्र असून पैशाच्या जोरावर विधिमंडळात जाऊ इच्छिणारे काही लोक तुम्हाला द्रव्याचे अमिष दाखवतील. अशा कोणत्याही मोहास तुम्ही बळी पडू नका. मोहास बळी पडलात तर तुम्ही आपल्या पायावर पर्यायाने समाजाच्या पायावर धोंडा मारून घ्याल हि धोक्याची सूचना मी आज सर्वांना देत आहे. मते विकत मागणाऱ्या माणसाला समाजाचा पाठिंबा नसतो, म्हणून तर तो द्रव्याच्या बळावर आपली लायकी प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करतो. अशा उमेद्वाराकडून समाजहिताची व राष्ट्रहिताची कार्ये होत नाहीत. पैसेवाला जर कायदे मंडळात गेला तर तो पैसेवाल्या लोकांचे हितसंरक्षण करील व तो सर्वसामान्य व गरिबांच्या हिताच्या आड येईल. म्हणून मत विकण्याचे पाप तुम्ही करू नका व आपली दिशाभूल करून घेऊ नका !!' संदर्भ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ (१) पान नंबर ४६६ ) महामानवाचे बोल असंघटित कष्टकरी मजूर, शेतमजूर, नाका कामगार, घरकामगार, हाताने कष्टकरणारा एकूण ९३ टक्के कामगार हा मतदार म्हणून राजकीय परिवर्तन करू शकतो. पण तो दररोजच्या मिळणाऱ्या मजुरी सारखी मजुरी मतदानच्या दिवशी मत विकुन मिळवणार असेल तर त्याची एका दिवसाची मजुरी किती होते ते जरा तपासून बघा ? समजा एका मताचे १००० रूपये १८२५ दिवस (५ वर्ष) = ०.५४ रूपये एका दिवसाचे, जर कोणी एका मताचे २००० रूपये १८२५ दिवस (५ वर्ष) १.०९ रूपये एका दिवसाचे एका मताचे ३००० रूपये : १८२५ दिवस (५ वर्ष) १.६४ रुपये एका दिवसाचे, एका मताचे ४००० रूपये १८२५ दिवस (५ वर्ष) २.१९ रुपये एका दिवसाचे, एका मताचे ५००० रूपये १८२५ दिवस (५ वर्ष) २.७३ रुपये एका दिवसाचे होतात. हे. एका मतदारांचे मतदान केल्यामुळे पाच वर्षांचे उत्पन्न झाले. तेच जर एका उमेदवाराचे पाच वर्षाचे वार्षिक उत्पन्न पाहाल तर डोके ठिकण्यावर आल्या शिवाय राहणार नाही. मत विकुन आपली आणि आपल्या कुटुंबाची किंमत कवडीमोल करू नका?. चला लोकशाही मजबुत करूया... योग्य उमेदवाराला मतदान करूया. कष्टकरी कामगारांच्या बाजूने उभा राहणारा चरित्रवान, सामाजिक बांधिलकी ठेऊन वागणार, समाज हित, देश हिताला प्राधान्य देणारा उमेदवार त्यालाच मतदान करा. तो निवडून येणार नसेल तरी तुमच्या न्याय हक्क, अधिकारासाठी विचारधारेसाठी जनआंदोलन करणारा असला पाहिजे त्यालाच आपले बहुमूल्य मत दान करा, कारण एक मत परिवर्तन घडवू शकते हे लक्षात ठेवा.

**सागर रामभाऊ तायडे,मुंबई.**

# कल्याण-डोंबिवलीत स्वयंस्फूर्तीने नागरिक मतदानासाठी रांगेत

## बाचाबाचीच्या घटना, पोलिसांच्या तात्काळ मध्यस्थीने वादावर पडदा

**कल्याण (गणेश बागडे) :** कल्याण पूर्व, पश्चिम, डोंबिवली, कल्याण ग्रामीण विधानसभा निवडणुकीसाठी या चारही मतदारसंघातील नागरिकांनी बुधवारी सकाळपासून मतदान केंद्रांबाहेर स्वयंस्फूर्तीने रांगा लावल्या होत्या. या रांगांमध्ये ज्येष्ठ नागरिक, वृध्द, कामावर जाणाऱ्या नोकरदारांचा सर्वाधिक सहभाग होता. महिला वर्गाची रांगेतील हजेरी लक्षणीय होती. मतदान केंद्र परिसर, उमेदवारांचे मतचिठ्ठी देण्याचे मंच याठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याने मतदारांना आपल्या बाजुने वळविण्यासाठीच्या प्रकारांना आळा बसला होता. कल्याण पश्चिमेत उंबर्डे भागातील पुण्योदय पार्क परिसरात महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या समर्थकांनी मतचिठ्ठी देण्यासाठी मंच लावला होता. या भागात महायुतीचा वरचष्मा आहे. आपल्या भागात आघाडीच्या उमेदवाराचा मंच कसा लागला, असा प्रश्न महायुतीच्या एका कार्यकर्त्याने करून आघाडीच्या कार्यकर्त्याला मंच लावण्यास विरोध करून त्याला शिवीगाळ केली. यावरून दोन गटात शाब्दिक बाचाबाची झाली. खडकपाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पोलिसांच्या मध्यस्थीने हा विषय तात्काळ मिटविण्यात आला.

आघाडीच्या उमेदवाराला तेथे मंच लावण्यास परवानगी देण्यात आली. डोंबिवली पश्चिमेत राजूनगर परिसरात एक माजी नगरसेवक आणि एक स्थानिक कार्यकर्ता यांच्यात बाचाबाची झाली. भाजपच्या वरिष्ठाने या प्रकरणात मध्यस्थी करून या प्रकरणावर पडदा टाकला. ग्रामीणमधील दातिवली भागात दोन गटात बाचाबाची झाल्याची चर्चा होती. राजकीय चढाओढीतील हे किरकोळ प्रकार वगळता कल्याण, डोंबिवली परिसरात मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. मतदान केंद्र परिसरात मतदारांना कोणी कसलेही आमिष दाखविणार नाही याची विशेष काळजी पोलिसांनी घेतली होती. ज्येष्ठांचे सकाळीच मतदान मतदानाच्या पाच दिवस अगोदर भारतीय निवडणूक आयोग, पक्षीय उमेदवारांकडून मतदारांना घरपोच आपल्या मतदान केंद्राचे ठिकाणाची माहिती व्हॉटसप, मतचिठ्ठ्यांमधून दिली होती. त्यामुळे मतदार स्वयंस्फूर्तीने घरातून बाहेर पडून मतदान केंद्रावर येत होते. सकाळी सात वाजल्यापासून वृध्द, ज्येष्ठ नागरिक, कामावर जाणारे नोकरदार मतदानासाठी रांगेत होते. मतदारांचा उत्साह ओसंडून वाहत होता. मतदान केल्यानंतर मतदार केंद्राजवळील सेल्फी केंद्रात सेल्फी काढत होते. मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास परवानगी नव्हती तरी अनेक जण मतदान केंद्रावर मोबाईल घेऊन आले होते. मतदान केंद्रांबाहेर वृध्द, ज्येष्ठ नागरिक यांना पाणी, आसन व्यवस्थेची सोय करण्यात आली होती. नोकरीनिमित्त अमेरिकेत राहत असलेल्या कॉर्पोरेट अपूर्वा पांडे दोन दिवसापूर्वी डोंबिवलीत दाखल झाल्या आहेत. डोंबिवली पूर्वेतील मतदार यादीत नाव असल्याने अपूर्वा यांनी सावरकर रस्त्यावरील संगीता विद्यामंदिरात मतदान केले. मतदानासाठी सुट्टी असल्याने बहुतांशी नोकरदार रांगेत तिष्ठत राहून मतदान करण्यास लागू नये म्हणून सकाळीच मतदानासाठी कुटुंबीयांसह बाहेर पडला होता.

## पान १ वरून...


### ▶▶| मणिपूरमध्ये शांतता नांदावी यासाठी...


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मणिपूरला भेट देण्यास नकार देणे समजण्यापलीकडे असल्याचेही खरगे यांनी आपल्या दोन पानी पत्रात म्हटले आहे. अलीकडेच काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश यांच्यासह मणिपूर काँग्रेसचे प्रमुख के. मेघचंद्र सिंग, काँग्रेस राज्य प्रभारी गिरीश चोडणकर, मणिपूरचे खासदार ए. बिमोल अकोइजाम आणि अरुणाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री नबाम तुकी यांनी खरगे यांची भेट घेऊन त्यांना परिस्थितीची माहिती दिली होती.


### ▶▶| मतदान केंद्राबाहेर गाडी सापडले लॅपटॉप,...


ही सर्व यंत्रणा टेस्टिंगसाठीची असल्याचं संबंधित कर्मचाऱ्याने सांगितले.

पोलिसांनी गाडीतून जप्त केलेल्या सर्व वस्तू या मार्कोस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या आहेत. याचा वापर करून मोबाईलमधील चीप टेस्ट करण्याचे काम केले जाते. त्याच टेस्टिंगची सर्व यंत्रणा असल्याचे समोर आल्याने असे कोणतेही मतदान यंत्रणा हॅक करण्यासाठी आणलेल्या वस्तू नसल्याचे समोर आले आहे.


### ▶▶| नांदगावमध्ये तुफान राडा, भुजबळ-कांदेंचे...


नांदगावमध्ये तिहेरी लढत आहे. सुहास कांदे यांनी बोलावलेल्या मतदारांना भुजबळांनी अडवले. त्यानंतर दोन्ही बाजूंनी वादावादी झाली. या वादावादीतून दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत हाणामारी करणाऱ्यांना इतर कार्यकर्त्यांच्या मदतीने वेगळे केले.

शिवसेना शिंदे गटाचे आमदार आणि नांदगावचे उमेदवार सुहास कांदे यांनी त्यांच्या कॉलेजवर ऊसतोड कामगारांना डांबून ठेवले असल्याचा आरोप समीर भुजबळांनी केला. भुजबळ यांनी कांदे यांच्या कॉलेजवर छापा मारला. त्यावेळी हा प्रकार समोर आला.


### ▶▶| अल्पवयीन मुलाने दारू पिऊन वेगात गाडी...


तपास अधिकारी, पोलिस उपनिरीक्षक पंकज महाजन यांनी सांगितले की, आरोपी चालक १७ वर्षे १० महिन्यांचा आहे. तो मूळचा आसामचा आहे. पुण्यातील दिघी येथील लष्करी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षाचा विद्यार्थी आहे. त्यांचे वडील भारतीय लष्करात सैनिक आहेत. सोमवारी सायंकाळी आरोपीने मद्यप्राशन केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. यानंतर त्याने त्याच्या वडिलांची एसयूव्ही घेऊन अत्यंत वेगाने पुणे नाशिक मार्गावर कार चालवत निघाला. दारूच्या नशेत असल्याने त्याचे कारवरील नियंत्रण सुटले. यावेळी त्याने काही वाहनांना व दुचाकीला धडक दिली. आरोपी मुलाला किशोर न्याय मंडळासमोर हजर केले असता त्याला बाल निरीक्षण गृहात पाठविण्यात आले आहे.


### ▶▶| दिंडोरी येथे निवडणूक प्रक्रियेत हलगर्जीपणा,...


यामध्ये सुरगाणा येथील बागबारी केंद्रातील जिल्हा परिषद शाळेचे लक्ष्मण आहेर, सुरगाणा येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे चंद्रकांत थविल, निफाड येथील के.जी.डी.एम. महाविद्यालयाचे महेंद्र पवार, चेतन कुंदे, सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे श्यामकुमार बोरसे, खर्डे येथील इंदिरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे हिरामण सूर्यवंशी, चांदोरी येथील क. का. वाघ वरिष्ठ महाविद्यालयाचे अमोल खालकर, जिल्हा परिषद उर्दू मुलांच्या शाळेचे तारिक गणी, अलंगुन येथील अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक आश्रमशाळेचे मोहन चौधरी यांचा समावेश आहे. निवडणूक प्रक्रियेत या नऊ जणांनी कामकाजात विलंब, अडथळा निर्माण केला. गैरहजेरीविषयी निवडणूक कार्यालयाकडे कुठलाही अर्ज, परवानगी पत्र सादर केलेले नाही. त्यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला असता अधिकारी, कर्मचारी यांनी भ्रमणध्वनी बंद करून ठेवला. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### ▶▶| सरवणकरांच्या कोटवरील उलटं धनुष्यबाण...


हा व्हिडीओ सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.

या मतदारसंघामध्ये सरवणकर आणि अमित ठाकरेंबरोबरच उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे महेश सावंतही निवडणुकीच्या रिंगणात असल्याने इथे तिरंगी लढत होताना दिसत आहे. या मतदारसंघातून अमित ठाकरेंना पाठिंबा देत सरवणकरांना उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याची जोरदार चर्चा काही दिवस रंगली होती. याचदरम्यान भेटीगाठी आणि चर्चांचे सत्र रंगल्याचं पाहायला मिळालं होतं. मात्र अखेरपर्यंत सरवणकर आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने ते आता तिसऱ्यांदा या भागातून आमदारकीची निवडणूक लढवत आहेत.


### ▶▶| महाराष्ट्राच्या जनतेचा कौल कुणाला?...


त्यानंतर इलेक्टोरल एज या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार, १२२-१८६ जागांवर महायुती आघाडीवर आहे. ६९-१२१ जागांव महाविकास आघाडी आणि १२-२९ जागांवर अपक्ष उमेदवार आघाडीवर असल्याचा अंदाज वर्तवला आहे. याशिवाय पोल ऑफ पोल्स या संस्थेने केलेल्या एक्झिट १५३ जागा महायुतीला १२२ जागां महाविकास आघाडीला मिळू शकतात. तर १२ जागावर अपक्षांना मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# पनवेल बस आगारातून मतदानासाठी गावाकडे जाणाऱ्या प्रवाशांचे झाले हाल



■ पहाटे काही प्रमाणात बस आगारात गर्दी होती. मात्र आम्ही बसगाड्यांचे नियोजन करुन बसच्या फे-या महाड व अलिबाग येथे जाण्यासाठी सूरु केल्या आहेत. प्रवाशांची सोय केली जात आहे.

**– डॉ. सुहास चौरे, वरिष्ठ आगार व्यवस्थापक, पनवेल बस आगार**

■ आम्ही सकाळी सहा वाजल्यापासून महाडमध्ये जाण्यासाठी पनवेल बस आगारात आलो आहे. कोणतेही ठोस उत्तर येथील आगारातील कर्मचारी देत नाही. उलट उद्धट उत्तर दिली जातात. आम्ही मतदानाला कसे पोहचणार असा प्रश्न पडलाय. मतदान हा राष्ट्रीय सण असे फक्त बोलले जाते. सामान्य प्रवाशांसाठी **नियोजनशुन्य कारभार असतो. – वसंत मोरे, प्रवासी, महाड,**

**पनवेल (धनश्री सट्टा) :** पनवेल बस आगारामध्ये मंगळवारी रात्रीपासून ते बुधवारी सकाळपर्यंत प्रवाशांची अभुतपूर्व गर्दी झाली होती. मतदानासाठी गावाकडे जाणा-या प्रवाशांना बसगाडी मिळत नसल्याने शेकडो प्रवासी बस गाड्यांअभावी खोळंबले होते. प्रवासी आणि राज्य परिवहन महामंडळाच्या आगार परिवहन निरिक्षकांमध्ये शाब्दिक वाद यावेळी झाला. सर्वाधिक प्रवासी महाड व अलिबाग या ठिकाणी जाणारे होते.

विधानसभा निवडणूकीसाठी निवडणूक विभागाला सरकारी बसगाड्यांची आवश्यकता असल्याने पनवेल बस आगारातील स्थानिक फे-या निम्या रद्द करुन निवडणूक विभागासाठी ५९ बस गाड्या पनवेल बस आगाराने दिल्या होत्या. मंगळवारी रात्री ते बुधवारी पहाटेपर्यंत वडखळ येथील वाहतूक कोंडीत त्यामुळे निवडणूकीचे साहीत्य सोडून येणा-या काही बसगाड्या अडकल्याने बुधवारचे पनवेल बस आगाराचे नियोजन बिघडले. याचा फटका रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये जाणा-या प्रवाशांना सहन करावा लागला. पहाटेपासून पनवेल बस आगारात मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी होती. बालक, महिला आणि वयोवृद्ध व्यक्तींचे यामध्ये हाल झाले.

# कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघात ५८.५० टक्के मतदान




कल्याण : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघात आज मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळी ७ वाजे पासून ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पार पडलेल्या मतदान प्रक्रियेत एकूण ५८.५० टक्के मतदान झाले.

कल्याण पश्चिम विधानसभेत एकूण ३ लाख २९ हजार १७३ मतदार असून यामध्ये १ लाख ७२ हजार ५४ पुरुष, १ लाख ५६ हजार ७०० महिला तर इतर 419 मतदार आहेत. यापैकी १ लाख १ हजार ४०८ पुरुष, ९१ हजार १०१ महिला, तर इतर ५७ अशा एकूण १ लाख ९२ हजार ५६६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. तर २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत एकूण ४३.६८ टक्के मतदान झाले होते. यामुळे यंदा वाढलेली मतदार संख्या लक्षात घेता एकूण मतदानामध्ये १४.८२ टक्क्यांची वाढ झाली आहे. कल्याण पूर्वेत महायुती भाजपाचे विद्यमान आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड, महाविकास आघाडी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे धनंजय बोडारे आणि शिवसेना बंडखोर अपक्ष उमेदवार महेश गायकवाड यांच्यात चुरशीचा सामना होत असून या तिघांमध्ये मतदार राजा कोणाला कौल देता हे निकाला नंतर समजेल.

# डोंबिवलीत मतदानाच्या पहिल्या चार तासांच्या सत्रात २० टक्के मतदान




**कल्याण (आकाश कांबळे) :** डोंबिवली विधान सभा मतदार संघातील मतदारांनी बुधवार (दि.२०) रोजी सकाळ पासूनच उत्स्फूर्तपणे मतदान केंद्रात जाऊन मतदानाचा हक्क बजावला. सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात होऊन मतदारांच्या लांबचलांब रांगा लागल्या. सकाळी सात ते नऊ या पहिल्या सत्रातील टप्प्यात ८.७६ टक्के झाले आहे. मतदान प्रक्रियेतील सकाळी नऊ ते अकरा या दोन तासाच्या कालावधीत मतदान टक्केवारी वाढली असून ११.५३ मतांची वाढ होऊन सात ते अकरा या चार तासांमध्ये २०.२९ टक्के मतदान झाले आहे. त्यामुळे गेल्या डोंबिवली विधानसभेच्या निवडणुकीत एकूण ४०.५८ टक्के मतदान झाले होते. ते यंदाच्या मतदानाच्या जवळ पास ५० टक्के मतदान झाले असून यंदा मतदानाच्या टक्केवारीत वाढ झालेली दिसून येत आहे. उर्वरित सात तासातील होणारे मतदान ५० टक्क्या हुन अधिक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. डोंबिवली विधान सभा मतदार संघात एकूण ३ लाख १३ हजार १२२ मतदार असल्याने आता पर्यंत ६९ हजार ७९४ मतदान झाल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यात सकाळी ११.०० वाजेपर्यंतची एकूण मतदान टक्केवारी १६.६३ टक्के झाली आहे.

# यंदा मतदान केंद्रावर मोबाईल वरून वादावादी बंद...

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)** – आज महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे.मतदान केंद्रावर मोबाईल घेऊन जाण्यावरून दरवर्षी वादंग निर्माण होत असल्याचे चित्र पाहायला मिळत होते परंतु यावर्षी निवडणूक आयोगातर्फे मतदान कक्षाबाहेरच मतदारांना आपले मोबाईल ठेवण्यासाठी मोबाईल लॉकरची सुविधा करण्यात आली आहे. त्यामुळे या सुविधेबाबत मतदारांनी समाधान व्यक्त केले आहे.



नागरिकांच्या जीवनामध्ये मोबाईल ही आज प्रत्येकाची गरज बनली आहे .परंतु मतदान करण्यासाठी जाताना नेहमी पोलीस व मतदारांमध्ये तसेच मतदार कर्मचाऱ्यांमध्ये वादांगाचे प्रसंग होत असल्याचे पाहायला मिळत होते. परंतु यंदा निवडणूक आयोगामार्फतच प्रत्येक मतदान कक्षाबाहेर मतदान लॉकरची सुविधा केल्यामुळे मतदानासाठी जाणाऱ्या नागरिकांना आपला मोबाईल मोबाईल लॉकरमध्ये सुरक्षित ठेवता येत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. प्रत्येक मतदान केंद्राबाहेर मोबाईल लॉकरमध्ये जवळजवळ सहा मोबाईल ठेवण्याची सुविधा करण्यात आलेली आहे. आपला मोबाईल निवडणूक आयोगामार्फत निर्माण करण्यात आलेल्या मोबाईल लॉकरमध्ये ठेवल्यानंतर त्याला लॉक करून मतदारांना मतदान कक्षामध्ये जाता येत आहे. तसेच मतदान करून मतदान कक्षाबाहेर आल्यानंतर आपल्या लॉकर मधून मोबाईल घेऊन मतदान कक्षाबाहेर पडता येत आहे. यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मतदान केंद्रापासून २०० मीटरच्या बाहेर मोबाईल ठेवावा लागत होता. त्यामुळे मतदारांमध्ये तसेच पोलीस व मतदान कर्मचाऱ्यांमध्ये वादंगाचे प्रसंग निर्माण होत होते. परंतु यावेळी निवडणूक आयोगामार्फतच मतदान कक्षाबाहेर मोबाईल लॉकरची सुविधा केल्यामुळे मतदारांनी समाधान व्यक्त केले आहे.

> दरवर्षी मतदानाला जाताना मोबाईल घेऊन जायचं की नाही तसेच मोबाईल घेऊन गेल्यावर तिथे मोबाईल कुठे ठेवायचा असा प्रश्न निर्माण होत होता. त्यामुळे मतदान कर्मचारी यांच्यामध्ये नेहमी वादाचे प्रसंग निर्माण होत होते. कारण घरापासून मतदान केंद्र लांब असल्यामुळे मतदारांना पुन्हा मोबाईल ठेवण्यासाठी घरी जावे लागत होते. त्याच्यातून आता मुक्तता झाली आहे. निवडणूक आयोगाने केलेले या सुविधेबद्दल आम्ही समाधानी आहोत.
>
> **- दिनेश खोत,मतदार**

# डोंबिवलीसह ग्रामीण भागात दारूचा महापूर; ३ अड्ड्यांवर धाड

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** विधानसभा निवडणूक सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार रविवारपासूनच ड्राय-डेच्या अंमलबजावणीला सुरूवात करण्यात आली आहे. मतदानाच्या पूर्वसंध्येला सर्व प्रकारच्या मद्य विक्रीला शासनाने बंदी घातली आहे. त्यामुळे अधिकृत परवानाधारी मद्य विक्रीची दुकाने बंद आहेत. अनेक मद्यपींनी गावठी दारूच्या अड्ड्यांवर धाव घेतली आहे. स्थानिक पोलिसांसह क्राईम ब्रँचच्या कल्याण युनिटने असे 3 अड्डे शोधून टाकलेल्या धाडीत दारूचा साठा जप्त केला आहे. सरमाडी दारूचे अड्डे शोधून मिळालेल्या तक्रारींप्रमाणे पोलिसांनी पश्चिम डोंबिवलीतील मोठागाव, २७ गावांपैकी कोळेगावात गावठी आणि देशी दारूच्या अड्ड्यांवर धाडी टाकून मोठा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी आत्तापर्यंत तीन दारू विक्रेत्यांवर मानपाडा आणि विष्णूनगर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



निवडणुकीच्या काळात झोपडपट्टीतील मतदारांना पैसै, ओल्या पार्ट्या, दारूचे आमिष दाखवून काही उमेदवारांच्या समर्थकांकडून अमिषे दाखविली जातात. त्यामुळे पोलिसांनी रात्रीच्या सुमारास गस्त वाढविली आहे. ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे परिसराची टेहळणी केली जात आहे.

पश्चिम डोंबिवलीतील मोठागावच्या टेकडी परिसरात असलेल्या शिवमंदिराजवळच्या झाडाखाली एक जण सरमाडी दारूची विक्री करत असल्याची माहिती क्राईम ब्रँचच्या कल्याण युनिटचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजित शिंदे यांना मिळाली होती. सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले, हवालदार यु. जी. खंदारे, दीपक महाजन घटनास्थळी रवाना झाले. तेथे पिंटू तुकाराम भोईर हा एका ड्रममध्ये 15 लीटर सरमाडी (हातभट्टी) दारू विक्रीसाठी बसला होता. पथकाने त्याला पकडून ताब्यात घेतले. विनापरवाना बेकायदा मद्य विक्री केल्याच्या आरोपाखाली हवालदार गोरक्ष शेकडे यांच्या फिर्यादीवरून विष्णूनगर पोलिस ठाण्यात पिंटू भोईर याच्या विरूध्द गुन्हा दाखल केला.

दुसऱ्या घटनेत विष्णूनगर पोलिसांनी मोठागावातील शिवमंदिराच्या जवळ असलेल्या अड्ड्यावर छापा टाकून गणेश संपत सहाने याच्याकडील सरमाडी दारूचा साठा जप्त केला. या प्रकरणी हवालदार श्रीराम मिसाळ यांनी विनापरवाना दारू साठा करून विक्री केल्याच्या सरकारतर्फे देण्यात आलेल्या तक्रारीनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तिसऱ्या प्रकरणात क्राईम ब्रँचच्या कल्याण युनिटचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली २७ गावांपैकी काटई-बदलापूर पाईपलाईन रोडला असलेल्या कोळेगावातील हनुमान मंदिराजवळ छापा टाकून २० लीटर सरमाडी दारूचा साठा जप्त केला. विनापरवानाही मद्य विक्री केल्याप्रकरणी हवालदार प्रशांत वानखेडे यांच्या फिर्यादीनुसार राजेश ओमप्रकाश गुप्ता याच्या विरूध्द मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मतदानावर बहिष्कार टाकलेल्या तृतीय पंथीय मतदारांनी अखेर केले मतदान

**कल्याण (विवेक गुंजाळ) :** कल्याण पूर्व मतदार संघात पोलीस अधिकारी वर्गासमवेत झालेल्या गैरसमजुतीमधून किन्नर पंथीय समुदायाने आज विधानसभा निवडणुकीतील मतदानावर बहिष्कार टाकला होता. तथापि निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी कर्मचारी, महापालिका अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेअंती हा प्रकार गैरसमजुतीमुळे घडला असल्याची प्रांजळ कबुली किन्नर समुदायाच्या जिल्हा आयकॉन नीता केणे यांनी आज दिली. नीता केणे यांच्या समवेत अनेक किन्नरपंथीय मतदारांनी आपली बहिष्काराची भूमिका मागे घेत मतदान केले. पोलीस अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या गैरसमजुतीतून हा प्रकार घडला असून किन्नरांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सगळ्यांच्या सहकार्याची आवश्यकता आहे आणि आज सगळ्यांच्या सहकार्यामुळेच आम्हाला मुख्य प्रवाहात आणले जाईल असा आशावाद नीता केणे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. किन्नर पंथीय मतदारांची



गैर समजूत दूर करून त्यांना मतदानास प्रवृत्त करण्यासाठी विधानसभा मतदान संघाचे केंद्रीय निवडणूक निरीक्षक अमित शर्मा, अप्पर पोलीस आयुक्त ठाणे संजय जाधव, निवडणूक निर्णय अधिकारी रमेश मिसाळ, परिमंडळ- 3 चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, स्वीपचे जिल्हा नोडल अधिकारी संजय जाधव, तेथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी मोलाची भूमिका बजावली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी ठाणे अशोक शिनगारे व कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड हे देखील या प्रकरणी वेळोवेळी मार्गदर्शन करीत होते.

# पनवेल रुग्णालयात नवजात बालकाचा मृत्यू

## आरोग्य व्यवस्थेच्या निष्क्रियतेचा आणखी एक बळी

**पनवेल (रोहित जैसवार) :** विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच रायगडमधील आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे समोर आले आहेत. शासकीय आरोग्य व्यवस्थेच्या निष्क्रियतेमुळे म्हसळा येथे एका मुलाच्या मृत्यूची घटना ताजी असताना पनवेलमध्येही तशीच घटना घडली आहे.

महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केलेल्या दोन दिवसांच्या नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी घडली. मुलाची तब्येत खालावल्यानंतर रुग्णाला तपासण्यासाठी डॉक्टर आलेच नसल्याची तक्रार मुलाच्या



पालकांनी केली आहे. गर्भवती महिला पनवेल तालुक्यातील आदई येथे वास्तव्यास होती.

रविवारी सकाळी प्रसूतीकळा सुरू झाल्यानंतर महिलेची घरातच डिलिव्हरी झाली. सकाळी साडेदहा वाजता प्रसूती झाल्यानंतर त्यांना लगेच उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तपासणीनंतर आई आणि बाळ दोघेही व्यवस्थित असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५ च्या सुमारास बाळाला ताप आल्याचे परिचारिकेला कळविले. परिचारिकेने बाळाला दूध पाजायला सांगून कोणाला तरी पाठवते, असे सांगितले. मात्र, परिचारिका, डॉक्टर फिरकलेच नाहीत. त्यानंतर बाळाला आई स्वत: घेऊन परिचारिकेकडे गेली. बाळ हालचाल करीत नसल्याचे सांगितले.

त्यानंतर आलेल्या डॉक्टरांनी तपास केल्यानंतर बाळाचा मृत्यू झाल्याचे कळविले. प्रसूतीनंतर २४ तास बाळ व्यवस्थित होते. डॉक्टर वेळीच हजर असते तर बाळाचा मृत्यू झाला नसता, असा आरोप बाळाच्या आईने केला आहे.

# भाईंदरमध्ये नरेंद्र मेहता अन् गीता जैन समर्थकांमध्ये बाचाबाची, पोलिसांची वेळीच मध्यस्थी अन्यथा...

**भाईंदर (सतीश सोनावणे) :** राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान सुरु आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारंसघात मतदान प्रक्रिया पार पडतेय. काही मतदारसंघांमध्ये राजकीय नेत्यांचे कार्यकर्ते आपापसात घडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. बीड, वर्धा, कोल्हापूर या जिल्ह्यातील विविध ठिकाणी कार्यकर्ते आमने सामने आल्याचं समोर आलं होतं. आता भाईंदर मध्ये देखील भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता आणि अपक्ष उमेदवार गीता जैन यांचे समर्थक आमने सामने आल्याचं चित्र पाहायला मिळालं.

भाईंदर पश्चिम येथील ६० फुटी रोडवर नरेंद्र मेहता आणि गीता जैन यांच्या समर्थकांमध्ये एक छोटीशी बाचाबाची झाली. ही घटना त्यावेळी घडली जेव्हा दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आपापल्या बूथजवळ उपस्थित होते. दोन्ही गटांमध्ये तणाव वाढल्यामुळे काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले, पण स्थानिक पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

घटना अशी घडली की दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते एकमेकांच्या जवळ आले आणि त्यानंतर काही शाब्दिक वादावादी सुरू झाली. नरेंद्र मेहता यांनी त्यांच्या विरोधकांवर आरोप केला की,



गीता जैन यांच्या समर्थकांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना धमकावले आणि त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केला. यामुळे दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाला आणि यांच्यातील तीव्र वादविवादामुळे छोट्या स्वरूपाची शारीरिक झडप ही झाली.

नरेंद्र मेहता यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, “आपल्या कार्यकर्त्यांना धमकवून घाबरवले जात आहे. ही संपूर्णपणे अनुशासनबाह्य आणि असंवेदनशील वर्तणूक आहे. आम्ही या प्रकाराला सहन करणार नाही.”

बीडच्या आष्टीमध्ये सुरेश धस आणि महेबुब शेख समर्थक भिडले

बीड जिल्ह्यामध्ये सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान प्रक्रिया पार पडत आहे. परळी विधानसभा मतदारसंघ वगळता पाचही मतदार संघामध्ये सुरळीतपणे मतदान प्रक्रिया दुपारपर्यंत पार पडली होती. आष्टी विधानसभा मतदारसंघातील पाटोदा तालुक्यातील बेदरवाडी गाव भाजपाचे उमेदवार सुरेश धस यांचे समर्थक आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार महबूब शेख यांच्या समर्थकांमध्ये काही कारणावरून बाचाबाची झाली. दरम्यान, वर्धा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते नितेश कराळे यांना मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. यानंतर नितेश कराळे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली असल्याची माहिती समोर आली आहे.



## स्वप्नील जोशी अन् प्रसाद ओक पहिल्यांदाच एकत्र झळकणार! सोबतीला असेल मालिकाविश्व गाजवणारी 'ही' अभिनेत्री

येत्या काही दिवसांत मराठी कलाविश्वात नवनवीन धाटणीचे आणि वैविध्यपूर्ण असे अनेक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. गरम गरम 'जिलबी'ची गोड चव काही औरच असते. अशीच एक लज्जतदार 'जिलबी' आपल्या भेटीला येणार आहे पण... मराठी चित्रपटाच्या रूपाने. हा चित्रपट पुढच्या वर्षी १७ जानेवारीला प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होणार आहे.

अभिनेता प्रसाद ओक आणि स्वप्नील जोशी या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एकत्र झळकणार आहेत. या तिघांच्या जोडीला पर्ण पेठे, गणेश यादव, प्रणव रावराणे, अश्विनी चावरे, प्रियांका भट्टाचार्य या कलाकारांनी आपल्या अभिनयाने मनोरंजनाच्या या 'जिलबी'चा खुसखुशीतपणा वाढवला आहे. या चित्रपटाचं आकर्षक असं पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं आहे. पोस्टरमधील कलाकारांचा लूक लक्ष वेधून घेणारा आहे. 'जिलबी' चित्रपटाचं दिग्दर्शन नितीन कांबळे यांनी केलं आहे.

'जिलबी'च्या पहिल्याच पोस्टरमध्ये प्रसाद, स्वप्नील आणि शिवानीचा जबरदस्त लूक पाहायला मिळत आहे. आता या तिघांभोवती नेमकं कसलं जाळं पसरलंय याचा उलगडा चित्रपट पाहिल्यावरच होईल. स्वप्नील आणि प्रसाद एकत्र झळकणार असल्याने सध्या प्रेक्षकांच्या मनात या चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. तर, यांच्या सोबतीला सध्या मालिकाविश्व गाजवणारी शिवानी सुर्वे प्रमुख भूमिका साकारणार आहे.

मराठी प्रेक्षकांसाठी 'जिलबी' हा चित्रपट जबरदस्त मनोरंजनाची ट्रीट असेल असं निर्माते आनंद पंडित सांगतात. गोड आणि गूढ अशी 'जिलबी' प्रेक्षकांना नक्की आवडेल आणि तिच्या मनोरंजनाचा चविष्ट आस्वाद प्रेक्षकांच्या मनात घर करेल असा विश्वास दिग्दर्शक नितीन कांबळे व्यक्त केला आहे.

'जिलबी' चित्रपटाची कथा-पटकथा-संवाद मच्छिंद्र बुगडे यांची आहे. तर, छायांकन गणेश उतेकर यांचं आहे. कलादिग्दर्शन कौशल सिंग यांचं असून क्रिएटिव्ह दिग्दर्शन राहुल व्ही. दुबे यांनी केलं आहे. रूपा पंडित आणि राहुल व्ही.दुबे सहनिर्माते असून चित्रपटाचे कार्यकारी निर्माते महेश चाबुकस्वार आहेत.

## "प्री-वेडिंग शूट गरजेचं आहे का?" अंकिताने होणाऱ्या नवऱ्यासह शेअर केला फोटो



'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे अंकिता वालावलकर घराघरांत लोकप्रिय झाली. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असलेली ही 'कोकण हार्टेड गर्ल' Bigg Bos शोपासून सर्वत्र 'महाराष्ट्र हार्टेड गर्ल' म्हणून ओळखली जाते. अंकिताचा स्पष्टवक्तेपणा, शोमधला तिचा खरेपणा प्रत्येकाला भावला. तिची लोकप्रियता प्रचंड वाढली. 'बिग बॉस'च्या घरात असतानाच तिने लवकर लग्नबंधनात अडकणार असल्याचं सांगितलं होतं. अंकिता वालावलकरचा होणारा नवरा कोण आहे हे जाणून घेण्यासाठी सगळेच उत्सुक होते. अखेर दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर 'कोकण हार्टेड गर्ल'ने तिच्या होणाऱ्या नवऱ्याबद्दल सर्वांना सांगितलं. अंकिताचा नवरा लोकप्रिय मराठी संगीत दिग्दर्शक असून त्याचं नाव कुणाल भगत असं आहे. अंकिता आणि कुणाल आता लवकरच लग्न करणार आहेत. 'बिग बॉस'मधून बाहेर आल्यावर येत्या फेब्रुवारी महिन्याच्या आधी लग्न करणार असं तिने अनेक मुलाखतींमध्ये सांगितलं आहे. मात्र, अंकिताने अद्याप तिच्या लग्नाची तारीख कोणालाही सांगितलेली नाही. अशातच तिने नुकत्याच शेअर केलेल्या एका पोस्टमुळे 'कोकण हार्टेड गर्ल' लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

# भुवनेश्वरीने मास्तरीण बाईंना दिलं खास गिफ्ट! दोघींमध्ये आहे सुंदर नातं

'तुला शिकवीन चांगलाच धडा' ही मालिका गेली दीड वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. यामधलं प्रत्येक पात्र आता घराघरांत लोकप्रिय झालं आहे. या मालिकेतील सासू-सुनेची जुगलबंदी प्रेक्षकांना विशेष भावते. भुवनेश्वरी आणि अक्षरा या दोघीही मालिकेत सतत भांडत असतात. आता तर, चारुलताच्या रुपातील भुवनेश्वरीने सुनेविरोधात मोठा कट रचला आहे. अर्थात हे सगळं Reel आयुष्य आहे. पण, खऱ्या आयुष्यात गोष्टी फारच वेगळ्या आहेत.

मालिकेत जरी भुवनेश्वरी-अक्षरा सतत एकमेकींशी वाद घालताना दिसल्या तरी, खऱ्या आयुष्यात कविता आणि शिवानी यांची मैत्री खूपच घट्ट आहे. भुवनेश्वरी हे पात्र अभिनेत्री कविता लाड-मेढेकर साकारत आहेत. तर, अक्षराच्या भूमिकेतून शिवानी रांगोळेने सर्वांचं मन जिंकून घेतलं आहे. ऑफस्क्रीन या दोघींमध्ये खूप छान मैत्री आहे. नुकताच कविता मेढेकरांनी त्यांचा वाढदिवस



साजरा केला होता. यानिमित्ताने शिवानी खास पोस्ट शेअर करत तिच्या लाडक्या ताईंना शुभेच्छा दिल्या होत्या.

कविता मेढेकरांनी शिवानीला दिलं खास गिफ्ट

आता या ऑनस्क्रीन सासू-सुना आणखी एका गोष्टीमुळे चर्चेत आल्या आहेत. ती गोष्ट म्हणजे कविता मेढेकरांनी त्यांच्या लाडक्या शिवानीला खास गिफ्ट दिलं आहे. गिफ्ट म्हणून भुवनेश्वरीने मास्तरीण बाईंना लाइट लेव्हेंडर रंगाचा ड्रेस दिला आहे. या ड्रेसवर पांढऱ्या फुलांची डिझाइन करण्यात आली आहे.

कविता मेढेकरांचं गिफ्ट पाहून शिवानी निश्चितच भारावून गेली आहे. ती लिहिते, "हा रंग मला सूर्यास्ताची आठवण करून देतो. पुस्तकांच्या वाचनासाठी घालवलेला आरामदायी वेळ, संथ सकाळ आणि आरामदायी अशा सर्व गोष्टींची चाहूल या छानशा रंगामुळे येते. या इतक्या सुंदर ड्रेससाठी खूप खूप थँक्यू कविता ताई!" अर्थात कविता मेढेकरांनी शिवानीला छानसा ड्रेस गिफ्ट दिल्याचं कॅप्शन आणि फोटो पाहून स्पष्ट होत आहे.

शिवानी रांगोळेने नव्या ड्रेससाठी आभार मानल्यावर या फोटोंवर कमेंट करत कविता मेढेकरांनी "थँक्यू Pretty गर्ल" असं म्हटलं आहे. याशिवाय अक्षराच्या आणखी काही चाहत्यांनी सुद्धा या फोटोंवर लाइक्स अन् कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.

# 'या' मराठी चित्रपटाने रचला इतिहास, प्रदर्शनापूर्वीच कमावले कोट्यवधी रुपये

गेल्या काही काळापासून महिला केंद्रित चित्रपटाच्या संख्येत वाढ झालेली पाहायला मिळत आहे. मग तो केदार शिंदे यांचा गाजलेला 'बाईपण भारी देवा' असो किंवा हेमंत ढोमे दिग्दर्शित 'झिम्मा २'. या चित्रपटांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे पाहायला मिळाले. महिलांचे आयुष्य, त्यांच्या जगण्याशी जोडलेल्या छोट्या मोठ्या गोष्टी, सामान्य स्त्रियांना आपली वाटणारी गोष्ट यांमुळे अशा चित्रपटांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विशेषत: महिला प्रेक्षकांनी चित्रपटगृहात गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. आता या चित्रपटांच्या यशानंतर मृणाल कुलकर्णी, आश्विनी भावे आणि श्रुती मराठे या तीन दिग्गज आणि प्रेक्षकांच्या लाडक्या अभिनेत्री अशाच एका चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'गुलाबी' असे या सिनेमाचे नाव आहे. चित्रपटाने रचला इतिहास! 'गुलाबी' या चित्रपटाची गेल्या



काही दिवसांपासून मोठी चर्चा असल्याचे पाहायला मिळत आहे.

मृणाल कुलकर्णी, आश्विनी भावे आणि श्रुती मराठे या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसत आहेत. तीन स्त्रियांची गोष्ट यामध्ये पाहायला मिळणार आहे. मात्र, प्रदर्शित होण्याआधीच चित्रपटाने इतिहास रचला आहे. तो नेमका काय, हे जाणून घेऊयात. प्लॅनेट मराठी, व्हायलेट मोशन पिक्चर्स आणि साई पियुष म्युझिक या तीन इन्स्टाग्राम चॅनेलने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये प्रदर्शित होण्याआधीच चित्रपटाने एक कोटी रुपयांची कमाई केल्याचे म्हटले आहे. महत्त्वाचे म्हणजे, प्रदर्शित होण्याआधी इतकी कमाई करणारा 'गुलाबी' हा पहिला मराठी सिनेमा ठरला असल्याचे या पोस्टमध्ये म्हटले आहे. सुरुवातीला 'गुलाबी' चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला. यामध्ये राजस्थानमधील दृश्य पाहायला मिळत आहे. यामध्ये आश्विनी भावे, श्रुती मराठे आणि मृणाल कुलकर्णी एकमेकींच्या मैत्रिणी असल्याचे दिसत आहे. एकीकडे त्या मजा मस्ती करताना दिसतात, तर दुसरीकडे प्रत्येकीच्या खासगी आयुष्यात काही ना काही चालू असल्याचे पाहायला मिळते. तर त्यानंतर 'गुलाबी' चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला. ट्रेलरच्या सुरुवातीलाच श्रुती आणि मृणाल यांच्या पात्रांमध्ये वाद झालेला पाहायला मिळतो. मृणाल रस्त्यावर वाट बघत उभी असते, श्रुती तिथून गाडीवरून जाते, त्यावेळी मृणालच्या अंगावर खड्ड्यातील पाणी उडते आणि त्यांच्यात वाद होतो. राजस्थानमध्ये पुन्हा त्यांची मैत्री झालेली दिसते. आता ही मैत्री कशी होणार, चित्रपटात नक्की कोणती गोष्ट दिसणार हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असल्याचे दिसत आहे. 'गुलाबी' हा चित्रपट २२ नोव्हेंबर २०२४ ला प्रदर्शित होणार आहे. आता प्रदर्शित झाल्यानंतर प्रेक्षकांना हा सिनेमा आवडणार का आणि चित्रपट किती कमाई करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



## महिलेच्या मनाचा आरसा दाखवणारी 'पिंगा गं पोरी पिंगा

रक्ताच्या नात्यापेक्षाही घट्ट असतं मैत्रीचं नातं. याच मैत्रीच्या नात्यावर आधारित आजवर अनेक कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला आल्या आहेत. अशातच आता महाराष्ट्राच्या लाडक्या 'कलर्स मराठी'वर पाच भिन्न स्वभावाच्या मैत्रीणींची भन्नाट गोष्ट प्रेक्षकांच्या भेटीला येतेय.'पिंगा ग पोरी पिंगा' या नव्या मालिकेत पाच मैत्रीणींची, त्यांच्या स्वप्नांची अनोखी दुनिया प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. ऐश्वर्या शेटे, विदिशा म्हसकर, शाश्वती पिंपळीकर, प्राजक्ता परब आणि आकांक्षा गाडे या अभिनेत्री मालिकेत महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. वैभव चिंचाळकर या मालिकेच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळत आहेत. 'पिंगा गं पोरी पिंगा' या मालिकेची गोष्ट आहे महाराष्ट्रातल्या त्या सगळया महिलांची ज्यांच्या मनात भविष्याची स्वप्न आहेत. स्वत: काहीतरी करुन दाखवायची जिद्द आहे आणि त्यासाठी घरापासून दूर बाहेरच्या जगात स्वत:चं अस्तित्व उभं करण्याची त्यांची धडपड सतत सुरू असते. या धडपडीत जेव्हा आपल्या सारख्याच अनेक सख्या त्यांना सापडतात तेव्हा त्या मैत्रीची रंगत जगावेगळी असते. पुरुषांच्या मैत्रीवर आधारित अनेक चित्रपट, नाटक, वेब सीरिजची निर्मिती झाली आहे. पण बायकांची मैत्री त्यापेक्षा खूप वेगळी असते आणि हीच मैत्री प्रेक्षकांना 'पिंगा गं पोरी पिंगा'मध्ये अनुभवता येईल.

# हास्य-विनोदाचा कल्ला करणारा श्री गणेशा'चा टिझर

मराठी चित्रपटसृष्टीत कायम विविध विषयांवर चित्रपट बनतात. या तुलनेत रोड मूव्हींची संख्या फार कमी आहे. त्यामुळेच अशा धाटणीचा एखादा चित्रपट आला की प्रेक्षकांच्या नजरा लगेच त्याकडे वळतात. याच कारणामुळे 'श्री गणेशा' हा नातेसंबंधांतील धम्माल गंमती-जंमतीवर आधारलेला मराठी फॅमिली एन्टरटेनर रोड मूव्ही घोषणा झाल्यापासून चर्चेत आहे. या चित्रपटाचा टिझर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. अल्पावधीतच प्रेक्षकांनी 'श्री गणेशा'च्या टिझरला लाईक करत त्यावर कमेंट्सही केल्या आहेत. थोडक्यात काय तर हास्य-विनोदाचा कल्ला करणारा 'श्री गणेशा'चा टिझर प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस उतरत आहे. हा चित्रपट २० डिसेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. 'श्री गणेशा' धमाल रोड ट्रीपचा आणि 'श्री गणेशा' फॅमिली एंटरटेनमेंटचा' असे म्हणत एमएच-१२ सिने मीडियाने आऊट ऑफ द बॉक्स फिल्म्सच्या सहयोगाने प्रस्तुत केलेला 'श्री गणेशा' चित्रपटाचा टिझर रिलीज केला आहे. या चित्रपटाची निर्मिती संजय माणिक भोसले आणि कांचन संजय भोसले यांनी




केली असून, लाफ्टर आणि मॅडनेसचा डबल धमाका असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन मिलिंद कवडे यांनी केले आहे. रवि माणिक भोसले आणि महेश माणिक भोसले या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा मिलिंद कवडे यांची असून, पटकथा संजय नवगिरे यांच्या साथीने लिहिली आहे. संवाद लेखन संजय नवगिरे यांनी केले आहे. सदानंद उर्फ टिकल्या आणि भाऊसाहेब पाटील यांच्या जोडीची अनोखी केमिस्ट्री या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. 'श्री गणेशा... होऊ दे रे होऊ दे...' असे गाणेही टिझरमध्ये कानावर पडते, जे चित्रपटाबाबतची उत्सुकता आणखी वाढवते. या चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकणाऱ्या प्रथमेश परब आणि शशांक शेंडे यांना दिग्दर्शक मिलिंद कवडे यांनी आजवर कधीही न दिसलेल्या रूपात सादर केले आहे. आजवर प्रथमेशने कायम लांब केसांच्या तरुणाची भूमिका साकारली आहे, पण यात त्याचे केस खूप छोटे करण्यात आले आहेत. याउलट कायम वाढलेल्या दाढी-मिशीत दिसणाऱ्या शशांक यांचा क्लीन शेव्ह लुक आहे.

# अशोक सराफ छोटा पडदा गाजवायला सज्ज!

महाराष्ट्राचे महानायक अशोक सराफ म्हणजेच आपले लाडके अशोक मामा. विनोदाचा बादशहा म्हणून त्यांची ओळख असली तरी हसता हसता डोळ्यातून पाणी आणणाऱ्या भावना निर्माण करणं ही सुद्धा त्यांची खासियत आपल्या सगळ्यांच्या परिचयाची आहे. अशोक मामांनी आजपर्यंत हिंदी, मराठी अशा वेगवेगळ्या भाषांतील सिनेविश्वावर अधिराज्य केलं. २००६ साली ते करत असलेली प्रसिद्ध हिंदी मालिका 'हम पांच' संपली तेव्हा त्यांनी मालिका विश्वाची रजा घेतली. त्यानंतर ते छोट्या पडद्यावर मालिकेमध्ये कधी दिसले नाहीत. पण आज अनेक वर्षांनी अशोक मामांना पुन्हा छोट्या पडद्याने खुणावलं, ते 'कलर्स मराठी'वर येणाऱ्या 'अशोक मा.मा.' या मालिकेने. २५ नोव्हेंबरपासून ही मालिका रात्री ८.३० वाजता प्रेक्षकांना आपल्या लाडक्या 'कलर्स मराठी'वर पाहायला मिळणार आहे. 'अशोक मा.मा.' या मालिकेचा विषय ऐकूनच इतके वर्ष टेलिव्हिजनसोबत घेतलेला दुरावा मामांनी संपवायचा ठरवला. एक वेगळा विषय करायला मिळतो आहे म्हणून ते पुन्हा एकदा छोट्या पडद्यावर तुमच्या मनोरंजनासाठी सज्ज झाले आहेत. सुप्रसिद्ध लेखक आणि कलाकार चिन्मय मांडलेकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकार झालेली 'अशोक मा.मा.' ही मालिका मजेदार, खुमासदार आहे. या मालिकेत अशोक मामांसह 'कलर्स मराठी'च्या 'पिरतीचा वनवा उरी पेटला' या मालिकेच्या माध्यमातून घराघरांत पोहोचलेली रसिका वाखारकर, नेहा शितोळे,






चैत्राली गुप्ते हे कलाकारदेखील महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. केदार वैद्य दिग्दर्शित या मालिकेची प्रेक्षकांना आता प्रतीक्षा आहे.

'कलर्स मराठी'चे प्रोग्रामिंग हेड केदार शिंदे मालिकेबद्दल म्हणाले,"अशोक मा.मा. या मालिकेच्या माध्यमातून अनेक वर्षांनी मामा आता छोटा पडदा काबीज करणार आहेत. 'अशोक मा.मा.' ही मालिका तुमच्या चेहऱ्यावर हसू आणणारी तर आहेच पण त्याच सोबत तुमच्या भावनेला हात घालणारी आहे, मनाला स्पर्शून जाणारी आहे. हसवता हसवता डोळ्यातून पाणी आणणारी आहे. दिग्दर्शन, लेखन, कलाकार या सर्व तगड्या गोष्टींचं उत्कृष्ट मिश्रण असणारी ही मालिका प्रेक्षकांना नक्कीच आवडेल याची मला खात्री आहे. मामांना अनेक वर्षांनंतर छोट्या पडद्यावर आणण्याचं इंद्रधनुष्य प्रॉडक्शन हाऊसह वाहिनीनेदेखील उचललं आहे. त्यामुळे आमच्या खांद्यावर ही मोठी जबाबदारी आहे".

रिटायरमेंटच्या वयात असलेले अत्यंत शिस्तप्रिय, काटेकोरपणे वागणारे असे अशोक मा. मा. मुंबईत राहत आहेत. त्यांच्या एकाकी आयुष्यात येणारे अनेक इरसाल नमुने आणि त्यांच्या सोबत येणारे अनेक धमाल मजेदार अनुभव आणि त्यातून उलगडत जाणारं अशोक ह्या पात्राच भावविश्व आणि त्याच्या सरळसाध्या आयुष्यात एक असं वादळ येतं ज्याने त्यांचं संपूर्ण आयुष्य ढवळून निघत.. हे वादळ काय असतं? त्यामुळे अशोकच्या शिस्तप्रिय आयुष्याला काय कलाटणी मिळते? हे गोष्टी सोबत उलगडत जातं. पहा, नवी गोष्ट 'अशोक मा.मा.', २५ नोव्हेंबरपासून रात्री ८.३० वाजता, फक्त कलर्स मराठीवर




**मेष** – पाहुण्यांचे स्वागत करावे लागेल. धंद्यात धावपळ होईल. आपल्या व्यक्तिमत्त्वाची इतरांवर छाप पाडाल. रागावर ताबा ठेवा.

**वृषभ** – कौटुंबिक जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडाल. आपल्या मानसिक चंचलतेला आवर घालावी. जुन्या गोष्टी सोडून द्याव्यात.

**मिथुन** – विरोधक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतील. तुमची जिद्द महत्त्वाची ठरेल. कष्टाने कार्य पार पाडाल. मित्र भेटतील.

**कर्क** – नोकरीत अचानक कामात बदल होऊ शकतो. संयम बाळगावा. तुमच्यातील कार्यक्षमता दाखवून द्यावी. कलेचा आस्वाद घ्याल.

**सिंह** – गैरसमज दूर करू शकाल. चैनीच्या वस्तू खरेदी कराल. अपयशाला घाबरून जाऊ नका. शक्यतो कोणत्याही वादात अडकू नका.

**कन्या** – काही तडजोडी स्वीकाराव्या लागतील. गोड बोलून धंद्यात वाढ करता येईल. आत्मविश्वास वाढेल. थकबाकी वसूल कराल.

**तूळ** – नोकरीत वर्चस्व राहील. मित्राला मदत करावी लागेल. कौटुंबिक खर्च नियंत्रणात ठेवा. वरिष्ठांकडून कौतुक केले जाईल.

**वृश्चिक** – कौटुंबिक वातावरण खेळकर राहील. कामात काही स्वरूपाचे बदल करावे लागतील. हाताखालील लोकांचे सहकार्य लाभेल.

**धनु** – मैत्रीतील गैरसमज दूर करावेत. आरोग्यात सुधारणा होईल. धाडसाने कामे हाती घ्याल. जनसंपर्क वाढेल. रागावर ताबा ठेवा.

**मकर** – बोलताना शब्दांचे वजन लक्षात घ्यावे. मनातील जुनी इच्छा पूर्ण होईल. जोडीदाराची प्रगती होईल. प्रवासात घाई करू नका.

**कुंभ** – उत्तम वैवाहिक सौख्य लाभेल. मालमत्तेचे व्यवहार सावधपणे करावेत. क्षुल्लक गोष्टींकडे दुर्लक्ष करा. नवीन ओळख होईल.

**मीन** – आपल्या वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. कामाचा व्याप सांभाळावा लागेल. कामात आततायीपणा करून चालणार नाही.

## नव्याने नाशिक-बोरिवली विद्युत बससेवा प्रारंभ



**नाशिक (सचिन कदम) –** महाराष्ट्र ई वाहन धोरणानुसार महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागात नाशिक-बोरिवली मार्गावर १२ मीटरच्या ई बस चालविण्यास बुधवारपासून सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी या सेवेस प्रवाशांचा प्रतिसाद लाभला. मतदानाचा दिवस असल्याने अनेकांनी मतदानानंतर बाहेर प्रवास करण्यास पसंती दिली. राज्य परिवहन महामंडळाकडून ई वाहन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. याअंतर्गत महामंडळाच्या नाशिक विभागात नाशिक, बोरिवली, कसारा, सप्तश्रृंगी गड या मार्गावर ई बससेवा सुरू आहे. सद्यस्थितीत नाशिक-बोरिवली मार्गावर धावणाऱ्या नऊ मीटर ई बस या सप्तश्रृंगी गड, नाशिक- कसारा आणि नाशिक- पिंपळगाव मार्गावर धावत आहेत. त्यामुळे नाशिक -सप्तश्रृंगी गड मार्गावर सहा तर नाशिक कसारा मार्गावर दोन अतिरिक्त फेऱ्या बुधवारपासून सुरू झाल्या. मुंबई नाका परिसरातील महामार्ग बस स्थानकात ज्येष्ठ नागरिक सुभाष कुलकर्णी यांच्या हस्ते तसेच विभागीय वाहतूक अधिकारी किरण भोसले, आगार व्यवस्थापक रोहिणी ठाकरे, प्रताप राजपूत आणि पर्यवेक्षक यांच्या उपस्थितीत नाशिक-बोरिवली शिवाई बसचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रवाशांना पेढे तसेच गुलाबपुष्प देत त्यांचे स्वागत करण्यात आले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य परिवहन महामंडळाच्या साधारण बस या मतदान प्रक्रियेत कार्यरत होत्या.

# सांगली जिल्ह्यात विधानसभेच्या निवडणुकीसाठी बससेवा कोलमडली


**सांगली (दिगंबर जाधव) :** सांगली जिल्ह्यातील विधानसभेच्या निवडणुकीसाठी ३९० बसेस मंगळवारपासून दोन दिवस तैनात करण्यात आल्यामुळे सर्वच आगारातील बससेवा मंगळवारी कोलमडली. बुधवारीही याचा परिणाम राहणार असल्याची माहिती एसटी विभागाकडून देण्यात आली. मंगळवारी जवळपास ७० टक्के लांब, मध्यम व स्थानिक बस सेवेत कपात करण्यात आली होती. त्यामुळे कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल झाले. जिल्ह्यात आठ विधानसभा मतदारसंघामध्ये मतदान घेण्यासाठी २ हजार ४८२ मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. यासाठी सुमारे साडेतेरा हजार कर्मचारी तैनात करण्यात



आले आहेत. यामुळे एसटीकडून ५८० वाहने जिल्हा प्रशासनाने ताब्यात घेतली आहेत. यामध्ये जवळपास चारशे बसेस घेतल्याने बस प्रशासनावर ताण आला आहे. यामुळे काही ठिकाणच्या लांब आणि मध्यम पल्ल्याची आणि स्थानिक बस वाहतूक रद्द करण्यात आली. सांगली जिल्ह्यातील दहाही आगारामध्ये सुमारे ७२० बसेस आहेत. यातील जवळपास चारशे बसेस निवडणुकीच्या कामात गुंतल्याने दहाही आगारातील बससेवा पूर्णपणे कोलमडली होती. मंगळवार दि. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी सातपासून २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडेपर्यंत या बसेस प्रशासनाच्या ताब्यात असणार आहेत. मंगळवारी दिवसभर सुमारे तीस टक्के बस वाहतूक सुरू असल्यामुळे काही बसेससाठी मोठी गर्दी होती. पुणे, मुंबई, कोल्हापूर, अमरावती आदी बस सेवेत कपात करण्यात आली होती. स्थानिक परिसरातील बसेस बंद ठेवण्यात आल्याने अभियांत्रिकीसह इतर महाविद्यालयांना जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल झाले.

**SPORT**

# India bowling coach Morkel puts "natural leader" tag on Bumrah before BGT kicks off in Perth



**New Delhi** -Bowling coach Morne Morkel has branded A-Lister Jasprit Bumrah as a "natural leader" before he walks for the toss to captain India in the Border Gavaskar Trophy series opener against Australia in Perth.

With Rohit Sharma set to miss the first Test of the highly-anticipated series, Bumrah will take the role of skipper. The 30-year-old was appointed as Bumrah's deputy when the squad was unveiled.

When reports started to suggest Rohit being sidelined for the opening Test, Bumrah emerged as the ideal candidate to take up the role. This will be the second instance of Bumrah leading the side following his spell in 2022 against England.

With Bumrah spearheading the pace attack and the team, Morkel believes that the star pacer will excel in both roles.

"Jassi [Jasprit Bumrah] was a guy who immediately put his hand up, and he wanted that leadership role. He's been very successful here in the past. He knows what to expect. In the dressing room, he speaks well. And he's a guy who I know that, with the ball in hand, will lead from the front and then the rest of the younger guys will follow," Morkel said in a press conference ahead of the opening Test on Friday.

The hype around the BGT has been surreal. India suffering its first home Test series whitewash in 24 years and Australia tasting defeat in ODIs against Pakistan has added another layer of spice to the heated rivalry.

Considering India's substandard record in Test cricket in Perth, the expectations have been mounting up on Bumrah's shoulders.

With everything going around in the backdrop of the series opener, Morkel feels once everything settles, a state of calmness will ensue in the team.

"It's an exciting sort of challenge ahead for him. But we've got to be right. We've got a lot of experienced guys who will help him. And I'm sure when he's bowling and a million things are going on in his head that will settle and bring a bit of calmness into the team," he said. "But in terms of leadership and in terms of how he looks at the game and produces the game, he's a natural leader for me with training. Let's see how we go about our business here," he added.

## Sourav Ganguly names Shubman Gill's replacement for Perth Test, backs youngster to 'lend proper balance to the side'





**New Delhi** -Former India captain Sourav Ganguly reckons top-order batter Shubman Gill's absence is a massive jolt for the side ahead of Perth Test. Gill fractured his thumb while fielding in the two-day match simulations at the WACA Ground. Ganguly backed other batters to step up in Gill and Rohit Sharma's absence in the Border-Gavaskar Trophy 2024-25 opener.

Ganguly backed young all-rounder Nitish Reddy to replace Gill. While he made it certain that Reddy will not bat at no.3, he said that the fast-bowling all-rounder's inclusion will provide balance to the side. Gill played a crucial role in India's Test series win on Australian soil the last time. He scored a game-changing 91 in the iconic run chase at the Gabba, Brisbane before Rishabh Pant took India home to script history. The 21-year-old Reddy bagged just one wicket for India A against Australia in two matches. He did not score a half-century with the bat as well. After a duck in first appearance, he scored 71 runs from three innings. However, he has been backed by the team management, especially on a bouncy track like Perth where Ganguly feels there is no point in playing with two spinners.

Before boarding the flight to Australia, head coach Gautam Gambhir said that they have moved on from Shardul Thakur. Reddy is raw when it comes to international cricket but capable of playing Thakur's role.

## China Masters: PV Sindhu Beats Busanan Ongbamrungphan To Enter 2nd Round



**New Delhi** - Double Olympic medallist PV Sindhu continued her dominant run against Busanan Ongbamrungphan, defeating the Thai shuttler in straight games to advance to the second round of the China Masters tournament on Wednesday.

World number 19 Sindhu dispatched the higher ranked Busanan 21-17, 21-19 in 50 minutes in the first round of the Super 750 event.

This was Sindhu's 20th win against the world number 11 in 21 meetings. Both shuttlers started off the match on an even keel with Busanan taking a 14-10 lead thanks to two unforced errors by the Indian. However, Sindhu went on a roll, winning the next nine points to take a 19-14 lead before closing the first game in her favour. But the loss in the first game didn't deter Busanan as she started the second game strongly. Although Sindhu trailed for most part of the second game, she continued to chip away at the points deficit with her aggressive play to take the lead for the first time in the game at 18-17. The star Indian shuttler promptly sealed the match.

## ICC Rankings: Hardik Pandya reclaims No. 1 T20I all-rounder spot, Tilak Varma enters top 10



**New Delhi** - Renowned Indian all-rounder Hardik Pandya has once again secured the top spot in the ICC T20I rankings following India's successful four-match series against South Africa. The 31-year-old, previously ranked third, has now surpassed England's Liam Livingstone and Nepal's Dipendra Singh Airee to reclaim his position at the pinnacle of T20I all-rounders.

Pandya's crucial innings of 39 not out in the second game of the series played a pivotal role in stabilizing India's performance, while his impressive bowling figures of 1/8 from three overs in the decisive fourth match contributed significantly to India's 3-1 series victory. This marks the second time Pandya has achieved the No.1 ranking for T20I all-rounders, having first attained this accolade at the conclusion of the ICC men's T20 World Cup earlier this year.

In addition to Pandya's stellar performance, young talent Tilak Varma's exceptional display in the series against South Africa has propelled him 69 places up the rankings, now securing a career-best third position in the T20I series. Varma's outstanding performance earned him the Player of the Series award for his remarkable contributions during the bilateral competition.

Varma's rise to third place overall places him just behind top-ranked T20I batter Travis Head and England's Phil Salt, making him the highest-rated batter from India. Meanwhile, India's captain Suryakumar Yadav has slipped to fourth place, with teammate Sanju Samson climbing 17 spots to 22nd in the T20I batters' rankings after his impressive performances against South Africa. Among the notable changes in the updated T20I bowlers' rankings, Australian duo Adam Zampa and Nathan Ellis have made significant strides, while India's Arshdeep Singh has gained three places to reach ninth position, achieving a new career-high rating following his standout performances against South Africa.

## Kuldeep Yadav's Brutal Response After Online Troll Abuses Him on X: 'Paise Mile Hain Ya...'



**New Delhi** - Leg-spinner Kuldeep Yadav has given a brutal reply to a troll on social media. The Chinaman bowler, who is currently at the BCCI's Centre of Excellence due to a groin injury, missed out on the Australia Tests which begins November 22 in Perth. He last appeared in the first Test against New Zealand where he returned wicketless. On Tuesday late at night, Kuldeep decided to confront a troll who abused him on the internet. The X user, with the handle named @Manas263, shared the spinner's picture from the ICC ODI World Cup 2023, stating that every Indian cricketer is getting criticized except Kuldeep. Agitated by the obscene language, Kuldeep gave it back and asked the person if he had been paid to make such a remark on a public platform or had some personal enmity. "Hanji kis cheez ki dikkat hai apko , itna pyara likhne ke liye paise mile ya koi Jati dus mani hai," Kuldeep wrote on X.

# दिवाळीत पुण्यातील हवा विषारी ! महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तपासणीत धक्कादायक निष्कर्ष

● पुणे, सुचिता देशमुख :

यंदा दिवाळीच्या काळात पुण्यातील हवा विषारी बनल्याचे समोर आले आहे. दिवाळीच्या कालावधीत हवेची प्रदूषण पातळी अनेक पटींनी वाढल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीतून निदर्शनास आले आहे. फटाक्यांमुळे हवेतील प्रदूषकांचे प्रमाण कमाल मर्यादा पातळीपेक्षा जास्त आढळून आले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने शहरात काही ठिकाणी दिवाळीच्या काळातील हवा प्रदूषणाची तपासणी केली. त्यात ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ ते १ नोव्हेंबर दुपारी १२ आणि १ नोव्हेंबर दुपारी १२ ते २ नोव्हेंबर दुपारी १२ अशा दोन दिवसांचा समावेश आहे. यातील पहिल्या दिवशी नरक चतुर्दशी होती, तर दुसऱ्या दिवशी लक्ष्मीपूजन होते. सर्वसाधारणपणे शहरात लक्ष्मीपूजनापासून फटाके मोठ्या प्रमाणात वाजविण्यास सुरुवात होते. त्यामुळे फटाके वाजविण्यास सुरू होण्याआधीचा कालावधी आणि सुरुवात झाल्यानंतरचा कालावधी अशी तुलनात्मक आकडेवारी मंडळाने दिली आहे.




शहरात शनिवारवाडा परिसरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने हवा प्रदूषणाची तपासणी केली. त्यात पहिल्या दिवशी पीएम १० या सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण सरासरी १३५.१९ होते. हेच प्रमाण दुसऱ्या दिवशी वाढून तब्बल ३९५.९६ वर पोहोचले.

दुसऱ्या दिवशी रात्री १२ वाजता हे प्रमाण १ हजार ५९९ या उच्चांकी पातळीवर पोहोचले होते. तसेच, पीएम २.५ या सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण पहिल्या दिवशी ५१.३२ होते; ते दुसऱ्या दिवशी १४० वर गेले. हे प्रमाण दुसऱ्या दिवशी रात्री १२ वाजता ५४९ वर गेले होते. सल्फर डाय ऑक्साईडचे प्रमाण पहिल्या दिवशी १३.७६ होते आणि दुसऱ्या दिवशी १७.२० नोंदविण्यात आले. हे प्रमाण दुसऱ्या दिवशी रात्री ११ वाजता २८.०५ वर पोहोचले होते.

### आरोग्यावर गंभीर परिणाम

हवेतील प्रदूषकांचे गंभीर परिणाम आरोग्यावर होतात. हे प्रदूषक फुफ्फुसांमध्ये जाऊन तेथून पुढे रक्तात मिसळतात. त्यानंतर ते शरीरातील अवयवांपर्यंत पोहोचून पेशी आणि ऊतींना हानी पोहोचवितात. हवा प्रदूषणामुळे हृदयविकाराच्या झटक्यासह ब्रेन स्ट्रोक, सीओपीडी, फुफ्फुसाचा कर्करोग यासह अनेक गंभीर आजार होऊ शकतात. त्यामुळे प्रदूषणापासून संरक्षण करण्यासाठी मास्कचा वापर करावा, असा सल्ला ससून सर्वोपचार रुग्णालयातील श्वसनविकारतज्ज्ञ डॉ. संजय गायकवाड यांनी दिला.

# धुळे जिल्ह्यात ३३६ चांदीच्या विटा असलेला कंटेनर ताब्यात



● धुळे, सचिन कदम :

विधानसभा निवडणुकीतील मतदानासाठी बुधवारी जिल्ह्यात पहाटेपासून प्रशासनाकडून तयारी सुरु झाली असताना शिरपूर तालुक्यातील थाळनेर पोलिसांनी पहाटे एक संशयास्पद कंटेनर ताब्यात घेतला. या कंटेनरमध्ये पोलिसांना चांदीच्या ३३६ विटा आढळल्या असून त्यांची किंमत ९४ कोटी ६८ लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. हा ऐवज एचडीएफसी बँकेचा असल्याचे प्रथमदर्शी म्हटले जात असून यासंदर्भात पोलिसांकडून संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा सर्व किंमती ऐवज चेन्नईहून जयपूरकडे नेला जाणार होता, अशी माहिती पोलिसांना मिळाली. यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी माहिती दिली. शिरपूर तालुक्यातील थाळनेर पोलिसांनी बुधवारी पहाटे पाच वाजता ही कारवाई केली. हा ऐवज पोलिसांनी अद्याप जप्त केलेला नाही. यासंदर्भात संबंधित एचडीएफसी बँक अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात येईल आणि वस्तुस्थिती जाणून घेण्यात येईल. खात्री झाल्यानंतर कारवाईचा निर्णय घेतला जाईल.

# लोकसभांच्या चुका सुधारून विधानसभेत योग्य नियोजनामुळे मतदानाला अधिक जलद गती !

## मुरबाड विधानसभा मतदारसंघात ७० टक्केअंदाजे मतदान ! आता लक्ष मतमोजणीकडे !

● ठाणे, रोहित जैसवार :



मुरबाड विधानसभा मतदारसंघाती मुरबाड , बदलापूर , कल्याण ग्रामीण, अंबरनाथ ग्रामीण या भागात सकाळपासून ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत सर्व मतदान केंद्रावर मतदार मध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले तर सर्वच म्हणजे ५१८ बुथ केंद्रावर विशेषता महिला वर्गाच्या रांगा दिसून आल्या.तर १३९मुरबाड विधानसभा मतदारसंघात अंदाजे ७० टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक प्रशासनाने दिली आहे.

तर २३ नोव्हेंबर २०२४ होणाऱ्या योजनेकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. तर मुरबाड विधानसभा मतदारसंघात केंद्रावर लोकसभा निवडणुकांच्या वेळेस झालेल्या चुका सुधारून निवडणूक आयोग आणि स्थानिक प्रशासनाने केलेल्या नियोजनामुळे मतदान जलद व अधिक सुलभ झाले.

# बीडमध्ये मतदान केंद्रावर उमेदवाराचाच मृत्यू; कुटुंबीयांवर शोककळा, कार्यकर्त्यांना धक्का

● सातारा, दिगंबर जाधव:

राज्यातील बीड जिल्ह्यात विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना काही मतदारसंघात गोंधळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी मतदारसंघातील घाटनांदूर येथे राडा झाल्याचं पाहायला मिळालं, त्यानुसार तीन मतदान केंद्रावर 1 तास मतदान यंत्रणा बंद होती. त्यामुळे, बीड जिल्ह्यातील मतदानाचा दिवस चांगलाच चर्चेत आला आहे. एकीकडे राड्यामुळे बीड (Beed) जिल्हा चर्चेत असतानाच, दुसरीकडे बीड विधानसभा मतदारसंघातून एक दुर्दैवी आणि धक्कादायक घटना समोर आली. बीड विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार बाळासाहेब शिंदे यांचा मतदान केंद्रावरच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला आहे. आपल्या उमेदवाराचा मृत्यू झाल्याने कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला आहे.

बाळासाहेब शिंदे बीड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवत होते. त्यामुळे, आज मतदानाच्यादिवशी ते बीड शहरातील छत्रपती शाहू



विद्यालयात असणाऱ्या मतदान केंद्रावर थांबले होते. यादरम्यान त्यांना चक्कर आली अन् ते खाली पडले. त्यानंतर, कार्यकर्त्यांनी त्यांना तात्काळ बीड शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तिथून त्यांना छत्रपती संभाजी नगर येथील रुग्णालयात नेण्यात आले. पण, डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केलं. दरम्यान, या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शिंदे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून उमेदवार शिंदे यांच्या कार्यकर्त्यांनाही या घटनेनं मोठा धक्का बसला आहे.

बीड विधानसभा मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना असतानाही दोन अपक्ष उमेदवारांचा अर्ज आल्याने ही निवडणूक चौरंगी होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस महाविकास आघाडीकडून संदीप क्षीरसागर यांना उमेदवारी देण्यात आली असून राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीकडून योगेश क्षीरसागर निवडणूक लढवत आहेत. या दोन्ही पक्षाच्या उमेदवारांना दोन अपक्षांचे आव्हान असणार आहे. त्यामध्ये, मनोज जरांगे पाटील समर्थक अशी ओळख असलेल्या अनिल जगताप हेही निवडणूक लढवत आहेत.

# समाज माध्यमात बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी गुन्हा



● पुणे, अभिजित येरल्लू :

समाज माध्यमात बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी एकाविरुद्ध कोंढावा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी अझहर तांबोळी आणि साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रशांत सुदामराव जगताप (वय ४७, रा. अनुसया निवास, वानवडी) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

हडपसर विधानसभा मतदार संघातून जगताप निवडणूक लढवत आहेत. जगताप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) उमेदवार आहेत. अझहर तांबोळी आणि साथीदारांनी समाज माध्यमात जगताप यांच्याविरुद्ध बदनामीकारक मजकूर प्रसारित केला. तांबोळी आणि साथीदारांनी दिशाभूल करणारा संदेश प्रसारित केल्याचे जगताप यांनी फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस निरीक्षक बेंद्रे तपास करत आहेत.

# महानगरांमध्ये मतटक्का वाढणार ?

● मुंबई, विशाल कारंडे :

निवडणुकीत राज्यात सरासरी ६६ टक्के मतदान झाले असले तरी मुंबई, ठाणे, नागपूर आणि पुण्यात ६० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले होते. मुंबईसह मोठ्या शहरांमधील कमी मतदानाचा कल लक्षात घेता उद्या मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे आव्हान निवडणूक आयोगासमोर आहे.

राज्यात सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीत ६६ टक्के मतदान झाले होते. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत ६४.१४ टक्के मतदान झाले होते. त्याआधी २०१९च्या लोकसभा निवडणुकीत



राज्यात ५९ टक्के मतदान झाले होते. लोकसभा निवडणुकीत राज्यातील मतदानाची टक्केवारी काही प्रमाणात वाढली असली तरी मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूरमधील मतदानाची टक्केवारी कमी होती. यामुळेच शहरांमधील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी निवडणूक आयोगाने जाहिराती किंवा घरोघरी जाऊन जनजागृती केली आहे.

लोकसभा निवडणुकीत कुलाब्यात ४३.७५ टक्के एवढे कमी मतदान झाले होते. मंत्रालय, विधान भवनाचा समावेश असलेल्या कुलाब्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यावर स्थानिक स्वयंसेवी संघटनांनी प्रयत्न केले आहेत.

लोकसभेत मुंबई शहरात ५१.३६ टक्के, तर उपनगरांत ५४.९६ टक्के मतदान झाले होते. ठाणे जिल्ह्यात ५३.८५ टक्के, पुणे ५५.१९ टक्के, नागपूर ५७.४८ टक्के मतदान झाले होते. यामुळेच शहरी भागात अधिक मतदान व्हावे अशी भूमिका मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी मांडली होती

मुंबई, ठाण्यात मतदारांमधील निरुत्साह ही निवडणूक आयोगाच्या दृष्टीने डोकेदुखी आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाने मुंबईसह मोठ्या शहरांच्या सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. मतदानासाठी जनजागृती करण्यात आली होती.

# मालेगावात दोन ठिकाणी मतदार यंत्रात दोष

● मालेगाव, दिगंबर जाधव :



मालेगाव बाह्य मतदार संघातील या.ना.जाधव विद्यालय व निळगव्हाण प्राथमिक शाळा अशा दोन केंद्रांमधील मतदान यंत्रे नादुरुस्त झाल्याने मतदानासाठी आलेल्या मतदारांना काही काळ ताटकळत बसावे लागले.

या.ना.जाधव विद्यालयात सकाळी 'मॉक टेस्ट'झाल्यावर प्रत्यक्ष मतदान सुरू करीत असताना मतदान यंत्र सुरू होईना. नंतर विद्युत जोडणीत दोष असल्याचे लक्षात आले. हा दोष दूर झाल्यावर यंत्र सुरू झाले. त्यामुळे जवळपास १५ मिनिटे मतदारांना ताटकळत राहावे लागले. त्यामुळे मतदान केंद्रांवर रांगा लागल्या होत्या. शहराजवळच असलेल्या निळगव्हाण येथे सकाळपासूनच मतदानासाठी लोकांच्या रांगा लागल्या होत्या. तेथील एका केंद्रावर ६५ मतदारांनी आपला हक्क बजावल्यानंतर अचानक मतदान यंत्र बंद पडले. ही बाब केंद्राध्यक्षांनी वरिष्ठांना कळविल्यावर तेथे तातडीने पर्यायी यंत्र उपलब्ध करून देण्यात आले. हे किरकोळ दोष दूर झाल्यावर तेथे सुरळीत मतदान सुरू झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी निर्मळ यांनी सांगितले.

# विरार राड्यानंतर भाजप नेते विनोद तावडेंनी मानले शरद पवारांचे धन्यवाद




● मुंबई, विशाल पाटील

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटल्याचा आरोप झाला. विरारमधील विवांता हॉटेलमध्ये तावडे हे जवळपास तीन ते चार तास अडकून पडले होते. बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांनी त्यांचे पुत्र क्षितिज ठाकूर यांच्यासह कार्यकर्त्यांनी हॉटेलला गराडा घातला होता. जवळपास चार ते पाच तासांनंतर शेवटी ठाकूरच तावडेंना आपल्या गाडीत घेऊन तिथून निघून गेले. या प्रकरणानंतर राज्यातील विरोधी पक्षातील नेत्यांनी तावडेंवर टीका करताना त्यांना पक्षातीलच नेत्याने अडकवल्याचं म्हणत निशाणा साधत आहेत. आज मतदान करण्यासाठी विनोद तावडे आल्यावर त्यांनी माध्यमांशी बोलताना शरद पवार यांचे का धन्यवाद मानले जाणून घ्या. विधानसभा निवडणूक तोंडावर असल्याने भाजपच्या राष्ट्रीय नेत्यावर पैसे वाटल्याचे गंभीर आरोप झाले. त्यानंतर विरोधी नेत्यांनी तावडेंसह भाजपवर जोरदार टीका केली. यावर शरद पवार यांनी बोलताना, विनोद तावडे चांगले गृहस्थ असून त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाल्याशिवाय मी यावर काही बोलणार नसल्याचं म्हटलं होतं. शरद पवार यांनी कोणतीही टीका न केल्याने तावडे यांनी त्यांचे धन्यवाद मानले. शरद पवार परिपक्व आणि ज्येष्ठ नेते आहेत. मला ते जवळून ओळखतात, मी अशा प्रकरणामध्ये असू शकत नाही त्यांना माहित आहे. त्यामुळे मी त्यांचे धन्यवाद मानतो, असं विनोद तावडे म्हणाले. यावेळी बोलताना नालासोपाऱ्यामध्ये जाणार असल्याची कोणालाही माहिती नसल्याचं तावडेंनी सांगितलं. मी नालासोपारा येथे जाणार हे कोणालाच माहिती नव्हतं. कारण मी पालघरमधील वाडा येथून निघालो असताना त्यावेळी उमेदवार राजन नाईक यांना फोन केला आणि काय चाल्लंय अशी माहिती घेतली. त्यावेळी आम्ही कार्यकर्त्यांसह बसलो आहोत चहा घ्यायला या.

# आरबीआयचा नागरिकांना सावधानतेचा इशारा — गव्हर्नर शक्तीकांत दास यांचा डीपफेक व्हिडीओ व्हायरल

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

गेल्या काही वर्षांपासून फसवणुकींच्या गुन्ह्यात कमालीची वाढ झाली आहे. यातच जगात तंत्रज्ञानाचा जसा फायदा आहे, तसा त्याचा तोटाही आहे. कारण तंत्रज्ञानाचा वापर करुन अनेकदा सायबर गुन्हेगारांनी अनेकांची मोठी फसवणूक केल्याच्या अनेक घटना समोर आलेल्या आहेत. आता अशीच एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. आरबीआयचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांचा एक डीपफेक व्हिडीओ तयार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एवढंच नाही तर यामधून गुंतवणुकीचा सल्ला देण्यात आला असून यासंदर्भातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल आहे. मात्र, यानंतर आरबीआयकडून एक निवेदन जारी करण्यात आलं असून अशा खोट्या व्हिडीओच्या विरोधात आरबीआयने जनतेला सावधानतेचा



इशारा दिला आहे. यासंदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे. दरम्यान, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने १९ नोव्हेंबर २०२४ रोजी एक निवेदन जारी करत सामान्य नागरिकांना सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओबद्दल चेतावणी दिली आहे. फसवणूक करणाऱ्यांनी या व्हायरल व्हिडीओमध्ये आर्थिक सल्ला देताना दाखवण्यात आलं असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. याबाबत आरबीआयने म्हटलं की, ही माहिती रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निदर्शनास आली आहे की, गव्हर्नर शक्तीकांत दास यांचा एक बनावट व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये आरबीआय गव्हर्नर काही गुंतवणूक योजना सुरू करताना किंवा समर्थन करताना दाखवण्यात आलं आहे. मात्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अशा प्रकारे आर्थिक गुंतवणुकीचा सल्ला देत नाही, असं आरबीआयकडून सांगण्यात आलं आहे.

### आरबीआयने दिलं स्पष्टीकरण..

आरबीआयने म्हटलं की, त्यांचे अधिकारी अशा कोणत्याही प्रकाराला समर्थन देत नाही. हे व्हिडीओ बनावट असून आम्ही अशा कोणत्याही आर्थिक गुंतवणुकीचा सल्ला देत नाहीत. अशा परिस्थितीत सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या डीपफेक व्हिडीओपासून नागरिकांनी सावध राहावं, असं आवाहन आरबीआयकडून करण्यात आलं आहे.

# मतदार माहिती चिठ्ठी नसल्याने अनुक्रमांक घोळ

● मुंबई, यश सावंत :

विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला सकाळी ७ वाजल्यापासून सुरुवात झाली. अनेक मतदार मतदान करण्यासाठी सकाळी ७ वाजता मतदान केंद्रांवर पोहोचले. मात्र मतदान केंद्रावर गेल्यावर अनुक्रमांक शोधण्यासाठी मतदारांचा बराच वेळ जात होता. यंदा मतदार माहिती चिठ्ठी घरोघरी पोहोचली नसल्यामुळे मतदान केंद्रावर जाऊन मतदारांना आपला अनुक्रमांक मिळवावा लागत होता. मतदारांची माहिती ऑनलाईनवर उपलब्ध करण्यात आली असली तरी मोबाइल घेऊन जाण्याची परवानगी नसल्याने अनुक्रमांक शोधण्यासाठी मतदारांना धावपळ करावी लागली. मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावे यासाठी निवडणूक आयोगाने मतदानासाठी प्रथमच शक्य असेलेल्या ठिकाणच्या गृहसंकुलात मतदान केंद्रे (बूथ) उपलब्ध केली आहेत. त्यापैकीच एक मतदान केंद्र भायखळा मतदारसंघातील एका गृहसंकुलात उभारण्यात आले आहे. दरम्यान, प्रत्यक्ष मतदान कक्षात मतदाराकडे अनुक्रमांकाची मागणी केल्यानंतर त्यांना रांग सोडून मतदार माहिती चिठ्ठी मिळविण्यासाठी गृहसंकुलाबाहेरील प्रवेशद्वारावर यावे लागत होते.